मासिक अंक

# महाआयटी संवाद

पहिला अंक – मार्च 2026



**श्री. देवेंद्र फडणवीस**
माननीय मुख्यमंत्री



**श्री. एकनाथ शिंदे**
माननीय उपमुख्यमंत्री



**श्रीमती सुनेत्रा अजित पवार**
माननीय उपमुख्यमंत्री



**ॲड. आशिष शेलार**
माननीय माहिती-तंत्रज्ञान मंत्री

## महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

# या अंकात...


मानानीय मुख्यमंत्र्यांचा संदेश 1

माननीय उपमुख्यमंत्री
श्री. एकनाथ शिंदे यांचा संदेश 2

माननीय उपमुख्यमंत्री
श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांचा संदेश 3

माननीय माहिती तंत्रज्ञान मंत्री 4

महोदयांचा संदेश

माननीय मुख्य सचिवांचा संदेश 5

माननीय अध्यक्षांच्या लेखणीतून 6

माननीय संचालकांच्या लेखणीतून 7

व्यवस्थापकीय संचालकांच्या लेखणीतून 8

मुख्य परिचालन अधिकाऱ्यांच्या लेखणीतून 9

मुख्य तंत्रज्ञान अधिकाऱ्यांच्या लेखणीतून 10

मुखपृष्ठ कथा - आपले सरकार :
नागरिक-केंद्रित, कालबद्ध आणि
पारदर्शक प्रशासनाचा चेहरा 12

महाआयटीचे लक्ष्य 14

थेट लाभ हस्तांतरणाचा प्रवास :
महाराष्ट्रातील कल्याणकारी योजनांचे
लाभ मिळू लागले विनासायास 15

शासन आपल्या दारी : अहिल्यानगरमध्ये
3,000 बालकांचे डिजिटल समावेशन 17

सक्षमीकरणाच्या वाटेवर: दिव्यांगत्वापासून
नेतृत्वापर्यंतची यशस्वी वाटचाल 18

वंचनेपासून समावेशनापर्यंतचा प्रवास:
परभणी जिल्ह्यातील दुर्गम गावाचे
डिजिटल परिवर्तन 19

महाराष्ट्रातील घराघरात आपले सरकार
प्रतिष्ठा निर्माण करत आहे! 20

शाळांमध्ये आधार सेवा :
धाराशिव जिल्ह्यातील एमबीयू शिबिरे 22

अहिल्यानगर जिल्ह्यातील मॉडेल "
आपले सरकार सेवा केंद्रे" 23

भारतजेन, आयआयटी मुंबई, ओपनएआय
आणि सर्वम एआय'सोबत महाराष्ट्राचे
ऐतिहासिक सामंजस्य करार 24

क्षमता विकास 25

महाराष्ट्राच्या दुर्गम भागात आधार 27

शिबिरांचे आयोजन

महाराष्ट्राच्या डिजिटल आणि एआय
रोडमॅपला बळकटी 28

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

जा.क्र/मु.मं.स/ज.क./८०/२०२६
दि. ११ फेब्रुवारी, २०२६

# शुभेच्छा

महाराष्ट्र तंत्रज्ञानाधारित विकासाच्या नव्या युगात प्रवेश करत आहे. उद्योगस्नेही, प्रभावी प्रशासन आणि भविष्यवेधी सुधारणा राबविणारे राज्य, अशी महाराष्ट्राची ओळख आहे.

राज्य शासनाने तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विकासाची नवी गाथा लिहायला सुरूवात केली आहे. शिक्षण, रोजगार, शेती, आरोग्य, पायाभूत सुविधा अशा सर्व क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन दिले जात आहे. राज्यातील प्रत्येक नागरिकाला शासकीय सेवांचा लाभ सहजपणे मिळावा यावर भर दिला आहे.

नागरी सेवा कालबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने प्रदान करण्यासाठी आरटीएस २.० सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून प्रशासनाचे आधुनिकीकरण केले जात आहे. कृषी, आरोग्य, शिक्षण, नियोजन आणि आपत्ती व्यवस्थापन, अशा विविध क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जाणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित शेतकरी सेवा हे याचेच एक उत्तम उदाहरण आहे. या सेवेअंतर्गत मोबाईलमार्फत तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत पोहोचू शकते, वेळेवर मार्गदर्शन, जोखीम कमी करू शकते आणि उत्पादकता सुद्धा वाढवू शकते.

राज्य शासन मुख्यमंत्री डॅशबोर्ड, जीआयएस मॅपिंग, चॅटबॉट्स आणि स्मार्ट तक्रार निवारण प्रणालीच्या माध्यमातून विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवत आहे. यामुळे नागरिकांना सेवा जलदगतीने प्रदान करता येतील, सेवा वितरण सुधारेल आणि नागरिक व सरकार यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण होईल, अशी खात्री वाटते.

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाची शासकीय सेवांची तंत्रज्ञानाशी सांगड घालून नागरिकांना सेवा प्रदान करण्याच्या या प्रवासात महत्त्वाची भूमिका आहे. महामंडळ डिजिटल पायाभूत सुविधा सक्षम करणे, उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा सुरक्षित वापर आणि विविध विभागांमध्ये समन्वयासाठी हातभार लावत आहे. यामुळे महाराष्ट्र राज्य डिजिटल प्रशासनात आणि नागरिक-केंद्रीत सेवा वितरणात देशस्तरावर आघाडी घेईल, असा विश्वास आहे. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाच्या या पहिल्या अंकाला माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, ई-मेल : cm@maharashtra.gov.in
वेब साईट : www.maharashtra.gov.in

एकनाथ संभाजी शिंदे
उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

सत्यमेव जयते

10 FEB 2026

## शुभेच्छा

सर्वप्रथम मी आपल्या मासिकाच्या प्रकाशनासाठी महाआयटी टीमचे अभिनंदन करतो. राज्याच्या विकासातील टप्प्यांची अचूक नोंद ठेवणे, अनुभवांचे आदान प्रदान करणे आणि परस्पर सहकार्य वाढविण्यासाठी हे मासिक निश्चित उपयोगी ठरेल.

विकासातून सर्वसामान्य माणसाच्या जीवनात बदल घडला पाहिजे यावर आमचा भर आहे. केवळ योजनांची घोषणा करणे पुरेसे नाही तर त्या प्रभावीपणे पूर्ण करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. चांगले रस्ते, परवडणारी घरे, स्वच्छ पाणी, कार्यक्षम सार्वजनिक सेवा आणि रोजगाराच्या संधी यांना आमचे प्राधान्य आहे. शहरे, गावे आणि ग्रामीण भागात मोठ्या प्रकल्पांसोबतच स्थानिक पातळीवर सुधारणा सुद्धा सुरू आहेत. यामुळे प्रवासाचा वेळ, खर्च कमी होईल, आणि नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

प्रशासन अधिक पारदर्शक, सोपे आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. त्याचबरोबर शेती हा आमचा महत्त्वाचा विषय असून, शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी आणि त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष उपयोग केला जात आहे.

या उपक्रमामुळे शासनाला प्रगत, सर्वसमावेशक आणि डिजिटलदृष्ट्या सक्षम महाराष्ट्र घडवण्यासाठी अधिक बळ मिळेल.

आपल्या टीमला माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा.

**(एकनाथ संभाजी शिंदे)**

**कार्यालय** : ६ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, **दूरध्वनी** : ०२२-२२०२ ५०१४ / २२०२ २४०१
**ई-मेल** : dcm@maharashtra.gov.in, **संकेत स्थळ** : www.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# उप मुख्यमंत्री

## महाराष्ट्र राज्य

दिनांक:- १० फेब्रुवारी, २०२६

## शुभेच्छा

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाच्या मासिकाच्या या पहिल्या अंकासाठी शुभेच्छा देताना मला मनापासून आनंद होतो आहे. भारताच्या प्रगतीमध्ये महाराष्ट्राने नेहमीच मोलाचे योगदान दिले आहे. आपल्या उच्च नैतिक आणि सामाजिक मूल्यांमुळे, मेहनती नागरिकांमुळे आणि समाजाप्रती असलेल्या जबाबदारीच्या जाणीवेमुळेच हे शक्य झाले आहे. विकासाचे फायदे राज्यातील प्रत्येक नागरिकापर्यंत, प्रत्येक समुदायापर्यंत आणि तळागाळातील प्रत्येक भागात पोहोचले पाहिजेत, यासाठी राज्य शासन नेहमीच प्रयत्नशील राहिले आहे.

राज्यातील नागरिकांच्या सर्वसमावेशक विकासासाठी महाराष्ट्र शासन वचनबद्ध आहे. कृषी, ग्रामीण उपजीविका, महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्यसेवा तसेच ग्रामीण आणि शहरी भागातील पायाभूत सुविधांसारख्या क्षेत्रांना आम्ही प्राधान्य देत आहोत. शेतकरी, कामगार, युवा वर्ग, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि उद्योजक, असे समाजाच्या सर्व स्तरातील घटक हे महाराष्ट्राच्या विकासाच्या प्रवासातले महत्त्वाचे भागीदार आहेत. राज्यातील प्रत्येक नागरिकाचे जीवनमान सुधारण्यासाठी, स्थिर उपजीविका निर्माण करण्यासाठी तसेच नागरिकांच्या सन्मानाची आणि सुरक्षिततेची खातरजमा करण्यासाठी राज्य शासन सातत्याने उपयुक्त धोरणे आणि कार्यक्रम राबवत आहे.

संतुलित प्रादेशिक विकास हे राज्य शासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. विकासाच्या प्रवासात महाराष्ट्रातील कोणताही भाग मागे राहू नये, यासाठी राज्यातील आकांक्षी जिल्हे, दुष्काळग्रस्त भाग आणि आदिवासी प्रदेशांवर विशेष लक्ष दिले जात आहे. रस्ते, सिंचन, गृहनिर्माण, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि सार्वजनिक वाहतूक या क्षेत्रांत वेगाने कामे सुरू आहेत. या प्रयत्नांमुळे राज्यातील ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागांमध्ये विकासाचे लाभ पोहोचतील आणि आर्थिक स्थैर्य निर्माण होईल, असा विश्वास मला वाटतो.

महाराष्ट्राच्या विकासाच्या या प्रवासात महिलांची भूमिका मोलाची आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण, स्वयंरोजगार, बचत गट आणि स्थानिक प्रशासनातील सहभागाला पाठिंबा देणारे उपक्रम प्राधान्याने राबवले जात आहेत. हे उपक्रम राबवताना महिलांचे सक्षमीकरण हे समाज आणि अर्थव्यवस्थेच्या वेगवान आणि सुदृढ वाढीसाठी उपयुक्त असल्याची लख्ख जाणीव आम्ही बाळगून आहोत.

कौशल्य विकास, दर्जेदार शिक्षण, क्रीडा आणि उद्योजकतेच्या माध्यमातून आम्ही युवा पिढीला समाज आणि अर्थव्यवस्थेत अर्थपूर्ण योगदान देण्यासाठी सज्ज करत आहोत. राज्यातील युवा वर्गाच्या हाती राज्याचे भविष्य सुरक्षित आहे, असा विश्वास आम्हाला वाटतो. राज्यातील बालके आणि युवा वर्गाबरोबरच ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि दुर्बलांसाठीच्या कल्याणकारी योजना राबवताना थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून शासकीय अर्थसहाय्य त्यांना सहज मिळावे, असा आमचा प्रयत्न आहे. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ या कामी मोलाची भूमिका बजावत आहे.

राज्यात सुशासन निर्माण करण्यासाठी पारदर्शक प्रशासन, शासकीय योजना प्रभावीरित्या राबविणाऱ्या संस्था आणि सक्रिय लोकसहभाग आवश्यक असतो. जेव्हा सरकार, समाज आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेतील सर्व भागधारक एकच ध्येय साध्य करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करतात, तेव्हाच अपेक्षित बदल साध्य होऊ शकतो. महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी असे प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या प्रत्येकाला माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा.

MIS Pawar S.A.

(सुनेत्रा अजित पवार)

ॲड. आशिष शेलार

सत्यमेव जयते

मंत्री
माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य
महाराष्ट्र राज्य

11 FEB 2026

# शुभेच्छा संदेश

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाच्या मासिकाच्या या पहिल्या अंकासाठी शुभेच्छा देताना मला मनापासून आनंद होतो आहे. तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीने आज आपले अवघे आयुष्य व्यापून टाकले असताना, तंत्रज्ञानाचा वापर करून राज्यात सुशासन प्रस्थापित करण्यासाठी, आणि नागरिकांना शासकीय सेवा सुलभरित्या उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाच्या माध्यमातून शासनाने राज्यातील नागरिकांसाठी एक प्रभावी मंच उपलब्ध करून दिला आहे.

प्रशासकीय सुधारणा करण्याच्या आणि त्यासाठी दूरदृष्टीने उपाययोजना राबविण्याच्या बाबतीत आपले महाराष्ट्र राज्य नेहमीच अग्रेसर राहिले आहे. प्रगत तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात प्रवेश करत असताना, तंत्रज्ञानाने नागरिकांना वास्तविक लाभ प्रदान केले पाहिजेत आणि शासकीय प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि नागरिक-स्नेही झाल्या पाहिजेत, यासाठी आम्ही आग्रही आहोत.

तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जीवनमान सुलभता आणि पर्यावरणीय शाश्वतता साध्य करण्याला राज्य शासनाचे प्राधान्य आहे. तंत्रज्ञानाचा वापर शासकीय प्रणालींपुरता मर्यादित राहू नये, तर प्रभावी शिक्षण, सार्वजनिक सेवा आणि माहितीची सुलभ उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने प्रगत तंत्रज्ञानाने नागरिकांच्या दैनंदिन जीवनाला स्पर्श केला पाहिजे. त्याच बरोबर उत्तम जलव्यवस्थापन, सक्षम वाहतूक आणि हवामान संबंधी आव्हानांवर प्रभावी उपाययोजना करून हरित महाराष्ट्र घडवण्याच्या कामीही तंत्रज्ञान सहायक ठरले पाहिजे. त्यासाठी सामाजिक प्रगती आणि पर्यावरणीय जबाबदारीच्या बरोबरीने राज्याची सर्वंकष प्रगती होत राहिल, याची खातरजमा करणे हे आमचे ध्येय आहे.

या प्रवासात महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित अर्थात -महाआयटी॰ची भूमिका महत्त्वाची आहे. सर्वोत्तम पद्धती, जिल्हा-स्तरीय उल्लेखनीय उपक्रम आणि प्रगत तंत्रज्ञान उपाययोजना प्रकाशझोतात आणून हे मासिक, धोरणे, अंमलबजावणी आणि नागरिकांच्या अनुभवाला दिशा देऊ शकते. त्याचबरोबर शासकीय विभाग, उद्योग विश्वातील दिग्गज, तंत्रकुशल मनुष्यबळ आणि युवा नवोन्मेषक या मंचावरून आपापल्या संकल्पनांची देवाणघेवाण करतील आणि राज्याच्या विकासाबाबत चर्चा करतील, अशी अपेक्षा आहे.

देशाचे पंतप्रधान आदरणीय श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीसजी यांच्या नेतृत्वाखाली आपले महाराष्ट्र राज्य उज्ज्वल भविष्याच्या दिशेने वाटचाल करते आहे.राज्यातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी, सक्षम, समावेशक आणि पर्यावरण रक्षणाप्रती सजग असा महाराष्ट्र घडवण्यासाठी सर्व भागधारकांसोबत समन्वयाने काम करत असताना, माननीय उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदेजी आणि श्रीमती सुनेत्रा अजित पवारजी यांच्या मार्गदर्शनाबद्दलही माझ्या मनात आदराची आणि कृतज्ञतेची भावना आहे.

तंत्रज्ञानाधारित उपक्रमांच्या माध्यमातून शासकीय योजनांचे लाभ जनसामान्यांपर्यंत अत्यंत प्रभावी पद्धतीने पोहोचविणाऱ्या महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाच्या या मासिकाला माझ्या अनेक शुभेच्छा. नागरिकांच्या हितासाठी राबविल्या जाणाऱ्या शासकीय योजनांच्या एकंदर प्रक्रियेत सक्रिय सहभागी असणाऱ्या सर्वच भागधारकांसाठी हे मासिक हा अनमोल ठेवा ठरेल, असा मला विश्वास वाटतो.

आपला

(ॲड. आशिष शेलार)



# माननीय
# मुख्य सचिवांचा संदेश

## श्री. राजेश अग्रवाल (भा.प्र.से.)

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्याने नेहमीच प्रशासकीय सुधारणा, आर्थिक प्रगती आणि संस्थात्मक नवोन्मेष यामध्ये अग्रणी भूमिका बजावली आहे. वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात सुशासनासाठी डिजिटल साधनांचा प्रभावी वापर अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. आज तंत्रज्ञान हे अंतिम उद्दिष्ट नसून, उत्तरदायी, पारदर्शक आणि नागरिक-केंद्रित प्रशासन उभारण्यासाठी एक सक्षम साधन आहे.

महाराष्ट्रासारख्या मोठ्या व वैविध्यपूर्ण राज्यामध्ये शासनाची व्याप्ती आणि गुंतागुंत लक्षात घेता, कार्यक्षम, विश्वासार्ह आणि विविध विभागांमध्ये तसेच भौगोलिक भागांमध्ये अखंड सेवा देणाऱ्या प्रणालींची आवश्यकता आहे. डिजिटल परिवर्तनामुळे प्रशासकीय क्षमता बळकट होते, सेवा वितरण सुधारते आणि जबाबदारीची भावना अधिक दृढ होते. तंत्रज्ञानाच्या मदतीने शासन नागरिकांच्या गरजांना वेळेवर आणि प्रभावी प्रतिसाद देऊ शकते.

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्राने ई-गव्हर्नन्स आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सच्या अंमलबजावणीत लक्षणीय प्रगती केली आहे. आता भर आहे एकात्मिक डिजिटल गव्हर्नन्सवर—जिथे प्रणाली परस्पर सुसंगत असतात, निर्णयांसाठी डेटाचा प्रभावी वापर केला जातो आणि विभागीय प्रक्रियांपेक्षा नागरिकांच्या अपेक्षा केंद्रस्थानी ठेवून सेवा रचना केली जाते. यामुळे कार्यक्षमता वाढते, प्रक्रिया सुलभ होतात आणि सेवा वितरणात एकसंधता येते.

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) सारखी उदयोन्मुख तंत्रज्ञाने शासन व्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता ठेवतात. महाविस्तार AI आणि भारत विस्तार AI सारखे उपक्रम ही दूरदृष्टी दर्शवतात की AI चा वापर केवळ शासकीय यंत्रणांपुरता मर्यादित न राहता नागरिक, उद्योजक आणि समुदायांना सक्षम करण्यासाठी केला जावा. शेती, आरोग्य, शिक्षण आणि उपजीविका यांसारख्या क्षेत्रांमध्ये AI सामान्य जनतेपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

डिजिटल शासनाने समावेशकतेला प्रोत्साहन दिले पाहिजे. ग्रामीण व शहरी भागांमधील दरी कमी करणे, शेवटच्या टप्प्यापर्यंत सेवा पोहोचवणे आणि सर्व घटकांसाठी सुलभ प्रवेश सुनिश्चित करणे ही महाराष्ट्राच्या डिजिटल दृष्टीकोनाची महत्त्वाची उद्दिष्टे आहेत.

या प्रवासात महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महा आयटी) महत्त्वाची भूमिका बजावत आहे. मजबूत डिजिटल पायाभूत सुविधा उभारणे, मानकीकरणाला चालना देणे आणि नवोन्मेषास प्रोत्साहन देणे हे राज्याच्या डिजिटल उपक्रमांच्या यशासाठी अत्यावश्यक आहे.

महाआयटी वार्तापत्राचा प्रारंभ हा योग्य वेळी हाती घेतलेला उपक्रम आहे. अनुभवांचे दस्तऐवजीकरण, उत्तम कार्यपद्धतींचे आदान-प्रदान आणि ज्ञानवृद्धी यासाठी हे एक प्रभावी व्यासपीठ ठरेल. या उपक्रमासाठी मी टीमला शुभेच्छा देतो आणि हे प्रकाशन महाराष्ट्राच्या तंत्रज्ञान-सक्षम, भविष्यासाठी सज्ज शासनाच्या प्रवासात मोलाचे योगदान देईल, असा विश्वास मला वाटतो.



# अध्यक्षांच्या लेखणीतून

**श्री. विरेंद्र सिंह (भा.प्र.से.)**
सचिव, माहिती तंत्रज्ञान \ अध्यक्ष, महाआयटी

## महाआयटी : महाराष्ट्राच्या डिजिटल भविष्याचा शिल्पकार

महाराष्ट्र आज आपल्या प्रशासकीय प्रवासातील एका महत्त्वपूर्ण टप्प्यावर उभा आहे. येथे तंत्रज्ञान हे केवळ सहाय्यक साधन राहिले नसून, कार्यक्षमता, पारदर्शकता आणि नागरिकांचा विश्वास वाढवणारे एक मूलभूत साधन बनले आहे. नागरिकांच्या अपेक्षा बदलत असताना आणि सेवा वितरण अधिकाधिक डिजिटल होत असताना, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महाआयटी) राज्याच्या डिजिटल भविष्याची दिशा ठरवण्यात एक धोरणात्मक भूमिका बजावत आहे.

डिजिटल युगातील प्रशासनासाठी विश्वासार्ह, सुरक्षित, परस्पर-सुसंगत आणि विस्तारक्षम प्रणालींची आवश्यकता असते. विविध शासकीय विभागांना प्रभावीपणे सेवा देता याव्यात यासाठी आवश्यक असलेली मूलभूत डिजिटल पायाभूत रचना उभारण्याची आणि तिचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी महाआयटीकडे सोपवण्यात आली आहे. राज्य डेटा केंद्रे, क्लाउड पायाभूत सुविधा, सुरक्षित नेटवर्क, सामायिक डिजिटल प्लॅटफॉर्म आणि सायबर सुरक्षा संरचना यांच्या माध्यमातून महाआयटी महाराष्ट्राच्या डिजिटल प्रशासन परिसंस्थेला भक्कम तांत्रिक आधार पुरवत आहे.

पारंपरिक ई-गव्हर्नन्सपासून एकात्मिक डिजिटल प्रशासनाकडे होत असलेला राज्याचा प्रवास हा परिणामाभिमुख प्रशासनाकडे होत असलेल्या व्यापक बदलाचे द्योतक आहे. विभागांना सुरुवातीपासून शेवटपर्यंत तंत्रज्ञानावर आधारित उपाय उपलब्ध करून देत, कार्यक्षमता वाढवणे आणि नागरिकांचा अनुभव सुधारणे या परिवर्तनात महाआयटीची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. समान प्लॅटफॉर्म, मानकीकृत आर्किटेक्चर आणि परस्परसुसंगत प्रणाली विकसित करून विभागांमधील पुनरावृत्ती कमी करणे आणि अखंड सेवा वितरण सुलभ करणे यावर विशेष भर देण्यात आला आहे.

डेटा-आधारित प्रशासन हे सुज्ञ धोरणनिर्मितीचे एक महत्त्वाचे अंग म्हणून पुढे येत आहे. विश्लेषण साधने, डॅशबोर्ड्स आणि डिजिटल मॉनिटरिंग प्रणालींच्या वापराला चालना देत महाआयटी पुराव्यावर आधारित निर्णयप्रक्रिया आणि योजनांचे रिअल-टाइम मूल्यमापन शक्य करत आहे. प्रणाली एकत्रीकरण आणि डेटा देवाणघेवाण सक्षम करून, विभागीय भिंती दूर करण्यास आणि अधिक समन्वयित व प्रतिसादक्षम प्रशासन घडवण्यास महाआयटी मदत करत आहे.

वाढत्या डिजिटल जोडणीच्या वातावरणात सायबर सुरक्षा आणि डेटा संरक्षणाला अत्यंत महत्त्व आहे. मजबूत सुरक्षा धोरणे, सातत्यपूर्ण प्रणाली निरीक्षण आणि विभागांमध्ये क्षमता निर्माण यांद्वारे सायबर लवचिकता वाढवण्यास महाआयटी कटिबद्ध आहे. डिजिटल प्रणालींची गोपनीयता, अखंडता आणि उपलब्धता सुनिश्चित करणे हे नागरिकांचा विश्वास टिकवण्यासाठी आणि महत्त्वाच्या शासकीय पायाभूत सुविधांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक आहे.

समावेशकता हा राज्याच्या डिजिटल दृष्टीकोनाचा केंद्रबिंदू आहे. तंत्रज्ञान हे समतोल साधणारे माध्यम ठरले पाहिजे, जेणेकरून शहरी तसेच ग्रामीण महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकापर्यंत डिजिटल प्रशासनाचे लाभ पोहोचतील. शेवटच्या टप्प्यापर्यंत डिजिटल पोहोच मजबूत करणे आणि ऑनलाइन सार्वजनिक सेवांचा व्यापक स्वीकार सुनिश्चित करण्यासाठी महाआयटी विविध उपक्रमांना पाठबळ देत आहे.

भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड-नेटिव्ह आर्किटेक्चर आणि डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर यांसारखी उदयोन्मुख तंत्रज्ञाने प्रशासनात अधिक महत्त्वाची भूमिका बजावतील. सुरक्षा, विस्तारक्षमता आणि शाश्वतता सुनिश्चित करताना, उद्योग, स्टार्टअप्स आणि शैक्षणिक संस्थांशी सहकार्य करून नवकल्पनांना प्रोत्साहन देण्याचे कार्य महाआयटी पुढेही सुरू ठेवेल, असा विश्वास मला वाटतो.



# संचालकांच्या लेखणीतून


## सुश्री भुवनेश्वरी एस. (भा.प्र.से.)

संचालक, माहिती तंत्रज्ञान \ महाआयटी


## समावेशक डिजिटल गव्हर्नन्स

महाराष्ट्राला डिजिटलदृष्ट्या सक्षम, सर्वसमावेशक आणि भविष्यवेधी राज्य बनवण्याच्या ध्येयाला समर्पित असलेल्या 'महाआयटी' (MahaIT) या व्यासपीठाचा पहिला अंक सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. हे मासिक केवळ एक प्रकाशन नाही, तर कल्पना सामायिक करण्याचे, नाविन्यता दर्शविण्याचे आणि प्रशासनामध्ये तंत्रज्ञानाच्या परिवर्तनकारी भूमिकेचे दस्तावेजीकरण करण्याचे एक व्यासपीठ आहे. अभूतपूर्व वेगाने डिजिटल महाराष्ट्र विकसित होत असताना राज्य पारदर्शकता, कार्यक्षमता आणि नागरिक-केंद्रित सेवा वितरण वाढवण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात अग्रेसर आहे.

आमच्या डिजिटल परिवर्तन अजेंड्याच्या केंद्रस्थानी डिजिटल सक्षमीकरण आणि समावेशकतेचे तत्त्व आहे. तंत्रज्ञानाने लोकांच्या जीवनात अर्थपूर्ण प्रभाव निर्माण केला पाहिजे. ग्रामीण कुटुंबे, शहरी गरीब, महिला, आदिवासी, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींसारख्या उपेक्षित समुदायांसाठी डिजिटल गव्हर्नन्स हे संधींचे पूल म्हणून काम केले पाहिजे. प्रत्येक नागरिकासाठी सरकारी सेवा सुलभ, न्याय आणि सन्माननीय असल्याची खात्री करणे ही आमची जबाबदारी आहे.

समावेशक डिजिटल प्रणाली कल्याणकारी योजना, शिक्षण, आरोग्य सेवा, वित्तीय सेवा आणि उपजीविकेच्या संधी सुलभ करून असमानता लक्षणीयरीत्या कमी करू शकतात. मजबूत डिजिटल प्लॅटफॉर्मच्या सहाय्याने सुरक्षित आधार प्रमाणीकरण सक्षम करून आणि इंटरऑपरेबल डेटाबेस सुनिश्चित करून, आम्ही एक अशी व्यवस्था तयार करत आहोत जी सार्वजनिक संस्थांवरील विश्वास वाढवते. डिजिटल साक्षरता आणि शेवटच्या टप्प्यातील कनेक्टिव्हिटीचा विस्तार करणे हे आमच्या प्रयत्नांचे केंद्र आहे. जेणेकरून भूगोल, भाषा किंवा सामाजिक-आर्थिक अडचणींमुळे कोणताही नागरिक मागे राहणार नाही. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात सुरक्षित, स्केलेबल आणि नागरिक-केंद्रित प्लॅटफॉर्म डिझाइन करणे हे आमचे प्राधान्य आहे, जे कार्यक्षमतेने आणि पारदर्शकपणे सेवा पुरवतात. डेटा-आधारित प्रशासन लाभांचे अधिक चांगले लक्ष्यीकरण, जलद तक्रार निवारण आणि सुधारित धोरण नियोजनास सक्षम करते. तंत्रज्ञान, सहानुभूती आणि उत्तरदायित्वासोबत एकत्रितपणे सामाजिक परिवर्तनाचे एक शक्तिशाली साधन बनते.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (Artificial Intelligence) आणि प्रगत विश्लेषण (advanced analytics) यांसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा स्वीकार करत असताना, आम्ही या तत्त्वावर मार्गदर्शित आहोत की नाविन्यता समानता वाढवते. डिजिटल प्रगतीमुळे मतभेद कमी झाले पाहिजेत. मला विश्वास आहे की 'महाआयटी' या प्रवासात भागीदारी, नाविन्यता आणि महाराष्ट्राच्या डिजिटल परिसंस्थेला बळकट करणारे महत्त्वाचे टप्पे दर्शविल. आपण एक असे राज्य निर्माण करूया जिथे तंत्रज्ञान उपेक्षित समुदायांना सक्षम करते आणि सर्वसमावेशक विकास सर्वांसाठी एक वास्तव बनेल.



# व्यवस्थापकीय संचालकांच्या लेखणीतून


## श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा. प्र. से.)

व्यवस्थापकीय संचालक, महाआयटी


## महाराष्ट्राच्या डिजिटल प्रशासनाची गरुडझेप!

भारताने नुकताच आपला 76 वा प्रजासत्ताक दिन साजरा केला असताना, आपण प्रत्येक नागरिकासाठी न्याय, समानता, पारदर्शकता आणि संविधानाच्या चिरस्थायी वचनाप्रती आपली सामूहिक वचनबद्धता पुन्हा एकदा दृढ करत आहोत. महाराष्ट्रात ही वचनबद्धता लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी, प्रशासनावरील विश्वास मजबूत करण्यासाठी आणि विकासाचे फायदे शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतील याची खात्री करण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग अत्यंत प्रभावीपणे होत आहे. शासनाने अत्यंत विश्वासाने ही जबाबदारी 'महाआयटी'वर सोपवली असून आम्ही ती नम्रपणे उत्तरदायित्वाच्या भावनेने स्वीकारली आहे.

गेल्या दशकात महाराष्ट्राचा डिजिटल प्रवास निर्णायकपणे विकसित झाला आहे. वेगवेगळ्या ई-गव्हर्नन्स प्रकल्पांपासून ते डिजिटल प्रशासनाच्या एकात्मिक, नागरिक-केंद्रित दृष्टिकोनापर्यंत यशस्वीरित्या पोचला आहे. या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी 'आपले सरकार पोर्टल' आहे, जे सार्वजनिक सेवा हक्क (RTS) कायदा 2015 मध्ये नमूद केलेल्या तत्त्वांचे दृढपणे पालन करताना सरकारी सेवांपर्यंत पोहोच सुलभ करण्यासाठी तयार केला आहे. जे एका सेवा-एकत्रीकरण मंचाच्या रूपात सुरू झाले होते, ते आता एका मजबूत डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधेत विकसित झाले आहे. जे पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि वेळेवर सेवा वितरण प्रशासनाच्या दैनंदिन कामकाजाचा अविभाज्य भाग बनवते. आज 'आपले सरकार' पोर्टलद्वारे अर्जांवर प्रक्रिया केली जाते, जे नागरिकांचा वाढता दृढ विश्वास दर्शवितात. नागरिक एकाच ठिकाणी प्रमाणपत्रे, कल्याणकारी योजना आणि आवश्यक सेवांसाठी अर्ज करू शकतात. ज्याला स्पष्टपणे अधिसूचित केलेल्या वेळेचा, रिअल-टाइम स्थितीचा मागोवा घेण्याचा आणि प्रत्येक टप्प्यावर मेसेजच्या माध्यमातून सूचनांचा आधार मिळतो. ही पारदर्शकता प्रत्यक्ष भेटींवरील अवलंबित्व कमी करते आणि अनिश्चितता दूर करून सेवा मिळवण्याच्या प्रक्रियेला प्रतिष्ठा मिळवून देते. विशेषतः विद्यार्थी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती आणि आदिवासी समुदायांसाठी याचा विशेष उल्लेख करावा लागेल.

नागरिकांच्या सेवेसाठी 40 हजारांहून अधिक 'आपले सरकार सेवा केंद्रांचे' राज्यव्यापी जाळे तितकेच महत्त्वाचे आहे. समर्पित डिजिटल सेवकांद्वारे चालवली जाणारी ही केंद्रे सरकार आणि जनता यांच्यातील खरा दुवा म्हणून काम करतात. अनेकदा दुर्गम, ग्रामीण आणि वंचित भागांमध्ये काम करणारे हे सेवक डिजिटल प्रणालींशी अपरिचित असलेल्या नागरिकांना मार्गदर्शन करतात, अचूक कागदपत्रांची खात्री करतात आणि सेवा वितरणातील आव्हाने सोडवण्यासाठी प्रथम प्रतिसादक म्हणून कार्य करतात. त्यांच्या प्रयत्नांमुळे तंत्रज्ञान-आधारित प्रशासन सर्वसमावेशक, सुलभ आणि पूर्णपणे मानवकेंद्रित राहते.

'महाआयटी'चे ध्येय केवळ डिजिटायझेशनपुरते मर्यादित नसून प्रशासकीय प्रक्रियांसाठी नागरिकांना प्राधान्य देऊन पुनर्रचना करण्याबद्दल आहे. त्यात प्रामुख्याने विलंब कमी करणे, पारदर्शकता वाढवणे, नियमांचे पालन आणि डेटा-आधारित निर्णयक्षमतेला सक्षम करणे, या बाबींचा समावेश आहे. पुढील पिढीच्या डिजिटल उपक्रमांकडे वाटचाल करत असताना, आमचे लक्ष्य स्पष्ट असून तंत्रज्ञानाने जीवन सोपे करून नागरिकांना सक्षम करणे अपेक्षित आहे. महाआयटी ई-मॅगझिनची ही पहिली आवृत्ती संपूर्ण महाराष्ट्रातील प्रभाव, नावीन्य आणि सर्वसमावेशकतेच्या कथा सादर करते. या प्रजासत्ताक दिनी आपण असा महाराष्ट्र घडवण्याचा संकल्प दृढ करूया, जिथे सुशासन सुलभ, प्रतिसाद देणारे आणि विश्वासार्ह असेल; जिथे तंत्रज्ञान लोकशाहीला बळकट करेल; आणि जिथे प्रत्येक नागरिकाला राज्याशी खऱ्या अर्थाने जोडल्याचा अनुभव येईल.



# मुख्य परिचालन अधिकाऱ्याच्या लेखणीतून

**श्री. भगवान पाटील**
मुख्य परिचालन अधिकारी, महाआयटी

## भविष्यासाठी सज्ज डिजिटल महाराष्ट्राची उभारणी

महाराष्ट्र आज भारतातील आघाडीच्या डिजिटल अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून उदयास आला आहे. राष्ट्रीय GDP, औद्योगिक वाढ आणि नवोपक्रमांमध्ये राज्याचे योगदान लक्षणीय आहे. IT-ITES सेवा, स्टार्टअप्स, उत्पादन क्षेत्र आणि थेट परकीय गुंतवणूक (FDI) यामध्ये देशात अग्रस्थानी असलेल्या महाराष्ट्राची प्रगती आता मजबूत डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञानाधारित प्रशासनामुळे अधिक गतीमान होत आहे.

डिजिटल परिवर्तनासाठी आम्ही स्पष्ट आणि व्यवहार्य दृष्टिकोन स्वीकारला आहे—तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सेवा वितरण अधिक प्रभावी करणे, प्रशासकीय अडथळे कमी करणे आणि शासकीय यंत्रणा मोठ्या प्रमाणावर कार्यक्षमपणे चालतील याची खात्री करणे. या संपूर्ण प्रवासात महाराष्ट्राच्या मुख्य डिजिटल प्रशासन प्लॅटफॉर्म्सची उभारणी, संचालन आणि सातत्यपूर्ण सुधारणा करण्यामध्ये महाआयटीची मध्यवर्ती भूमिका आहे. गेल्या काही वर्षांत महाआयटीमुळे कागदाधारित आणि विभागनिहाय वेगळ्या असलेल्या प्रक्रियांमधून एकात्मिक, राज्यव्यापी डिजिटल प्रणालींकडे निर्णायक वाटचाल झाली आहे. आपले सरकार प्लॅटफॉर्ममुळे नागरिकांना प्रमाणपत्रे व विविध सेवा सहज उपलब्ध झाल्या आहेत, तर महाDBTमुळे कल्याणकारी लाभ थेट आणि पडताळलेल्या डिजिटल माध्यमातून लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत आहेत. MAITRI प्रणालीने विविध विभागांना एका डिजिटल इंटरफेसवर आणून औद्योगिक परवानग्या सुलभ केल्या आहेत. या सर्व प्रणालींमुळे प्रशासन अधिक वेगवान आणि पारदर्शक झाले आहे.

आज लाखो नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, महिला लाभार्थी, उद्योजक आणि उद्योग दररोज महाआयटी-सक्षम प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून सेवा आणि योजनांचे लाभ घेतात. आमचा भर या प्रणाली अधिक मजबूत करण्यावर आहे, जेणेकरून मोठ्या प्रमाणावर सेवा देताना विश्वासार्हता, सखोल एकात्मता आणि डेटावर आधारित प्रशासनात्मक परिणाम सुनिश्चित करता येतील.

महाआयटीच्या पुढील टप्प्यातील कामकाजाचा केंद्रबिंदू विद्यमान प्लॅटफॉर्म्सची क्षमता बुद्धिमत्ता आणि परस्परसुसंगततेच्या (interoperability) माध्यमातून वाढवण्यावर आहे. कृषी, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात AI-आधारित अनुप्रयोग विकसित केले जात आहेत, जे निर्णय प्रक्रियेला सहाय्य करतील, नियमित कामांचे स्वयंचलीकरण करतील आणि सेवांची गुणवत्ता सुधारतील. व्हॉइस-टू-टेक्स्ट आणि बहुभाषिक उपाययोजनांमुळे प्रवेशयोग्यता वाढत आहे, तर IoT-आधारित प्रणालींमुळे विभागांना प्रत्यक्ष वेळेतील निरीक्षण आणि कार्यक्षमतेची स्पष्ट माहिती मिळत आहे.

लवकरच सुरू होणारा एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे RTS 2.0—सार्वजनिक सेवा हक्क कायद्याची सुधारित चौकट. RTS 2.0 मध्ये प्रेडिक्टिव्ह ॲनालिटिक्स आणि अर्ली-वॉर्निंग यंत्रणांच्या माध्यमातून कायदेशीर कालमर्यादांचे काटेकोर पालन सुनिश्चित केले जाणार आहे. नागरिकांवर परिणाम होण्याआधीच संभाव्य विलंब ओळखून विभागांना सक्रिय हस्तक्षेप करता येईल, त्यामुळे तक्रारी कमी होतील आणि सेवा परिणाम अधिक चांगले होतील.

महा DBT द्वारे शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि वंचित घटकांपर्यंत थेट लाभ पोहोचवण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. DBT 2.0च्या माध्यमातून लाभार्थी ओळख अधिक अचूक करणे, गळती कमी करणे आणि प्रशासकीय खर्च घटवणे हे महाआयटीचे उद्दिष्ट आहे. प्रवेशयोग्यता वाढवण्यासाठी WhatsApp-आधारित सेवा, AI चॅटबॉट्स, बहुभाषिक इंटरफेस आणि मोबाईल अप्लिकेशन्सचा विस्तार केला जात आहे, जेणेकरून शासकीय सेवा कुठेही आणि कधीही उपलब्ध होतील.



# मुख्य तंत्रज्ञान अधिकाऱ्याच्या लेखणीतून


## कर्नल सचिन बेलोसे

मुख्य तंत्रज्ञान अधिकारी, महाआयटी


## डिजिटल महाराष्ट्रासाठी भविष्यवेधी दूरदृष्टी

आपले महाराष्ट्र राज्य आज एका निर्णायक वळणावर उभे आहे. आधुनिकतेची कास धरणाऱ्या एकविसाव्या शतकात राज्यात सुशासन, तंत्रज्ञान आणि नागरिकांच्या अपेक्षा यांचा सुरेख ताळमेळ साधला जात असताना, सर्वसमावेशक, लवचिक आणि भविष्यासाठी सज्ज अशी डिजिटल परिसंस्था, ही आज काळाची गरज ठरते आहे. आपल्याला तंत्रज्ञानसज्ज यंत्रणा आणि त्यासाठी पुरक मंच विकसित करण्याबरोबरच लोकहिताला केंद्रस्थानी ठेवणाऱ्या, प्रक्रिया सुलभ करणाऱ्या, तसेच विश्वास आणि संधी निर्माण करणारे माध्यम म्हणून तंत्रज्ञानाचा उपयोग करणाऱ्या विचारी नेतृत्वाची आवश्यकता आहे. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाचा अर्थात 'महाआयटी' वार्तापत्राचा पहिला अंक प्रकाशित करताना, डिजिटल महाराष्ट्राच्या उभारणीसाठीचा दृष्टीकोन मी आपणासमोर ठेवू इच्छितो. प्रक्रिया आणि तंत्रज्ञान या स्तंभांवर उभा असणारा, शाश्वत विकासाच्या दिशेने आगेकूच करणारा, आणि राज्याचे भवितव्य घडविणाऱ्या युवा वर्गाच्या अपेक्षा पूर्ण करणारा प्रगतीशील महाराष्ट्र घडविण्याच्या कामी योगदान देण्यास महाआयटी वचनबद्ध आहे, असे मी या निमित्ताने वाचकांना सांगू इच्छितो.

अपेक्षित उपाययोजना विकसित करण्यापुरती किंवा समस्यांवर तोडगा काढण्यापुरती मर्यादित भूमिका न घेता, पूर्वनियोजन करण्याला, आणि भविष्यातील गरजा विचारात घेत त्यांस अनुरूप उपाययोजना विकसित करण्याला आमचे प्राधान्य आहे. या दृष्टीकोनासह आम्ही सक्षम, कालसुसंगत आणि भविष्यासाठी सज्ज प्रणाली विकसित करत आहोत. भविष्याचे नियोजन करण्याचा विचार कृतीमध्ये उतरवताना, जबाबदारीने भविष्य घडविण्यावर आमचा भर आहे. महाराष्ट्र प्रगती करत आहे, आणि या प्रगतीमध्ये हातभार लावणाऱ्या महाआयटीमध्ये प्रतिभा, नावीन्य आणि नेतृत्वाला भरपूर वाव असल्याचा संदेश राज्यभरातील युवा वर्गापर्यंत पोहोचविण्यासाठी सुद्धा आम्ही प्रयत्नशील आहोत.

तंत्रज्ञान हे या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी आहे. महाराष्ट्र राज्य शासनाच्या विविध विभागांसाठी बहुविध प्रकल्पांवर काम करणाऱ्या महाआयटीमधील आमच्या विविध चमुंनी प्रगत वेब पोर्टल्स आणि मोबाईल ॲप्लिकेशन्सपासून व्हॉट्सॲपसारख्या सेवांच्या एकात्मीकरणापर्यंत, वैविध्यपूर्ण काम केले आहे, आणि त्यायोगे राज्यातील नागरिक आणि तंत्रज्ञान यांच्यात प्रभावी दुवे विकसित केले आहेत. प्रशासन अधिक प्रतिसादक्षम आणि पारदर्शक बनवण्यासाठी, एआय-प्रणित चॅटबॉट्स आणि प्रगत ॲनालिटिक्ससह, उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा उपयोग आम्ही करत आहोत. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे सेवांचे वितरण कसे सुलभ होते आणि नागरिकांचा यंत्रणेवरील विश्वास कसा दृढ होतो, हे, आपले सरकार (सेवांचा अधिकार), बीपीएमएस (बिल्डिंग प्लॅन मॅनेजमेंट सिस्टीम), महाडीबीटी, महापोलीस भरती आणि मुख्यमंत्री डॅशबोर्ड अशा उपक्रमांवरून दिसून येते. सध्या आम्ही आरटीएस 1.0 चे पुनरुज्जीवन आणि प्रगत आरटीएस 2.0 ची रचना करत आहोत. आमचे काम डिजिटायझेशनपुरते मर्यादित नाही तर प्रगत आणि उपयुक्त उपाययोजनांप्रति आमची वचनबद्धता हीच आमची प्रेरणा आहे.

महाआयटीमध्ये प्रगत तंत्रज्ञानाला प्रक्रिया आणि पायाभूत सुविधांचीही भक्कम साथ लाभते आहे. जुन्या प्रणालींचे डिजिटायझेशन करण्यापुरते आमचे काम मर्यादित नाही, तर आम्ही त्यांची फेररचना करत आहोत. नागरिक-केंद्रितता आणि कार्यक्षमतेला प्राधान्य देत आम्ही हे शिवधनुष्य पेलले आहे. तंत्रज्ञानाचे मूल्यमापन, खरेदी आणि महाराष्ट्र राज्य डेटा सेंटरच्या सुविहित कामकाजावर देखरेख ठेवणे हा माझ्या जबाबदारीचा एक महत्त्वाचा भाग आहे. क्षमता उभारणीच्या क्षेत्रात मोठी झेप घेत महाआयटी क्लाउड, एआय, सायबर सुरक्षा आणि महत्वपूर्ण शासकीय सेवांसाठी आवश्यक आणि उपयुक्त असणारी डेटा सेंटर

परिसंस्था विकसित करत आहे. जागतिक दर्जाची ही पायाभूत सुविधा विश्वसनीयता, सुरक्षा आणि मागणीला अनुरूप व्यापकतेची हमी देणारी आहे.

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाच्या या दृष्टीकोनाला कुशल मनुष्यबळ आणि बहुविध घटकांच्या भागीदारीचे सामर्थ्य लाभले आहे. माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाचे प्रभावी जाळे विकसित करण्याला आमचे प्राधान्य आहे, जेणेकरून महिला, शेतकरी, ग्रामीण उद्योजक आणि विद्यार्थी अशा समाजातील सर्व घटकांना डिजिटल उपक्रमांचा थेट लाभ घेता येईल. आज महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी तंत्रज्ञान ही अप्राप्य गोष्ट राहिलेली नाही. उत्तम माहिती, कार्यक्षम सेवा आणि उपजीविकेच्या चांगल्या पर्यायांसाठी आमचे शेतकरी तंत्रज्ञानाचा उत्तम वापर करतात. स्टारलिंकसारख्या तंत्रज्ञान क्षेत्रातील जागतिक दर्जाच्या अग्रणी कंपन्यांसोबतचे सहकार्य आम्हाला महाराष्ट्राच्या दुर्गम भागांपर्यंत कनेक्टिव्हिटी पोहोचवण्यास मदत करते, तर आयआयटी मुंबईसारख्या शैक्षणिक आणि नवोपक्रम केंद्रांसोबतची भागीदारी आम्हाला संशोधनाचे वास्तविक लाभ जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या कामी सक्षम करते. प्रशासन, संरक्षण, कृषी, गतिशीलता आणि शिक्षण या क्षेत्रांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची (AI) क्षमता निर्माण करण्यासाठी आम्ही 'इंडिया एआय मिशन'चाही अंगिकार करत आहोत.

भविष्याचा विचार करता महाआयटीचा हा दृष्टीकोन 'विकसित भारत' या राष्ट्रीय ध्येयाशी सुसंगत आहे. प्रशासनाला बळ देणारे तंत्रज्ञान, पारदर्शकता आणि उद्योग सुलभता जिथे सुखेनैव नांदते, असे तंत्रज्ञान-प्रगत राज्य, अशी ओळख महाराष्ट्राला लाभते आहे. आपले उज्ज्वल भवितव्य आता दूर नाही, ते आता दृष्टीक्षेपात आहे.

राज्य शासनाच्या सेवा सक्षमपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या कामी महाराष्ट्र राज्य शासनाने आणि नागरिकांनी महाआयटीवर दाखविलेल्या विश्वासाबद्दल माझ्या मनात कृतज्ञतेची भावना आहे. हा प्रवास यशस्वीरित्या पुढे नेण्यासाठी नवोन्मेषक, स्टार्टअप्स, तंत्रज्ञ आणि युवा व्यावसायिकांचे स्वागत करण्यास आम्ही उत्सुक आहोत. या, महाआयटीच्या कुटुंबात सामील व्हा. आपण सर्व मिळून डिजिटलदृष्ट्या सक्षम महाराष्ट्र घडवूया, एक असे भविष्य घडवूया जे सर्वसमावेशक असेल आणि जागतिक स्तरावर आदरास पात्र ठरेल.




# आपले सरकार: नागरिक-केंद्रित, कालबद्ध आणि पारदर्शक प्रशासनाचा चेहरा

महाराष्ट्र राज्य शासनाने शासकीय सेवा आणि लाभ राज्यातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या पद्धतीत मागच्या दशकभरात निर्णायक बदल केले आहेत. महाआयटीतर्फे विकसित 'आपले सरकार' उपक्रम या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी आहे. विखुरलेल्या शासकीय सेवा डिजिटल पद्धतीने एकाच मंचावरुन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने रचना करण्यात आलेले 'आपले सरकार' पोर्टल, आज एक व्यापक एकात्मिक डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा (डीपीआय) म्हणून विकसित झाले आहे. तंत्रज्ञानाधारित मंच, कायदेशीर आदेश, संस्थात्मक प्रक्रिया आणि तळागाळापर्यंत लाभ पोहोचविणारे सक्षम वितरण जाळे एकत्र आणणारा हा उपक्रम आहे. 'आपले सरकार' हे केवळ एक पोर्टल नाही तर हा उपक्रम, प्रशासनातर्फे नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा आणि लाभ प्रत्यक्ष प्रदान करण्याच्या कामी वरदान ठरतो आहे.

नागरिकांना शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सेवांचे एकत्रीकरण, हा 'आपले सरकार' उपक्रमाचा मूलभूत उद्देश आहे. प्रमाणपत्रे, परवाने तसेच शासकीय योजनांचे लाभ प्राप्त करण्यासाठी नागरिकांना पूर्वी विविध विभाग आणि कार्यालयांमध्ये फेऱ्या माराव्या लागत होत्या, तसेच वेगवेगळे अर्ज भरणे, त्यांना आवश्यक कागदपत्रे जोडणे अशी कामे करावी लागत होती. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाशी संरेखित केलेल्या सेवा 'आपले सरकार' मंचाने एकाच डिजिटल इंटरफेस अंतर्गत एकत्रित केल्या, त्यामुळे सेवा वितरणात स्पष्टता आली, प्रक्रियांचे मानकीकरण झाले आणि प्रत्येक सेवा प्राप्त करण्यासाठीची कालमर्यादा निश्चित झाली. या बदलांमुळे विविध सेवांसाठी विखुरलेल्या विभागीय कार्यप्रणालींऐवजी 'आपले सरकार'च्या माध्यमातून एक सामाईक नागरिकाभिमुख डिजिटल प्रवेशद्वार निर्माण झाले.

## डिजिटल प्रशासनाचा कणा

'सेवांच्या एकत्रिकरणासाठीचा मंच' या भूमिकेतून कामाला सुरुवात करणाऱ्या 'आपले सरकार' उपक्रमाने गेल्या काही वर्षांमध्ये परिपक्वतेच्या दिशेने प्रवास केला आहे. प्रशासनाचे लाभ प्रदान करणारे मुख्य डिजिटल माध्यम म्हणून हा मंच आज महाराष्ट्रात कार्यरत आहे. या मंचावर प्रमाणीकरण प्रणाली, कार्यप्रवाह, दस्तऐवज संग्रह, पेमेंट गेटवे, डॅशबोर्ड आणि तक्रार निवारण यंत्रणा एकत्रितपणे उपलब्ध आहेत. प्रत्येक विभागाच्या सेवांचे लाभ प्रदान करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा तयार करण्याऐवजी, ‘आपले सरकार' हा मंच सामायिक डिजिटल आधारस्तंभ म्हणून सक्षमपणे कार्यरत आहे. अशा प्रकारच्या सामाईक मंचामुळे दुहेरी नोंदी टाळता येत आहेत, परिचालन खर्च कमी होतो आहे, तसेच शासकीय यंत्रणांमध्ये चांगला समन्वय राहत असल्याचे दिसून आले आहे.

या एकात्मिक डीपीआय मॉडेलने प्रशासनाला संरचनात्मक लाभही दिले आहेत. राज्य शासनाच्या विविध विभागांना आपल्या अखत्यारितील सेवा प्रदान करण्यासाठी एक सामाईक मंच उपलब्ध झाला आहे. या मंचामार्फत सेवा प्रदान करण्यासाठी प्रत्येक विभागातील अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या परिभाषित करण्यात आल्या आहेत, कालमर्यादा निश्चित करण्यात आल्या आहेत. अर्जांची सद्यस्थिती प्रदर्शित करणारे डॅशबोर्ड आणि विश्लेषण उपलब्ध झाल्यामुळे प्रशासनाला कामगिरीचे निरीक्षण करणे, अडथळे ओळखणे आणि योग्य त्या उपाययोजना राबविणे सहज शक्य होते आहे. महाडीबीटी, आरटीएस आणि विविध विभागांच्या प्रणालींच्या एकत्रीकरणामुळे सेवा-प्रदानाशी संबंधित कार्यक्षमता आणि सुसंगतता सुधारली आहे. कालबद्ध पद्धतीने, पारदर्शकरित्या सेवा आणि लाभ प्राप्त होत असल्यामुळे नागरिकांच्या मनात प्रशासनाबद्दल विश्वासाची भावना निर्माण होते आहे.

शासकीय लाभ प्रदान करण्याच्या दृष्टीने डिजिटल मंच हे शक्तिशाली माध्यम असले तरी राज्याची सामाजिक आणि

भौगोलिक विविधता हे सेवा वितरणासमोरचे मोठे आव्हान ठरू शकते. आपल्या महाराष्ट्रातील सुमारे निम्मी लोकसंख्या ग्रामीण आणि निमशहरी भागात राहते, जिथे उपकरणे, कनेक्टिव्हिटी किंवा डिजिटल साक्षरता असमान असणे स्वाभाविक आहे. हे लक्षात घेत 'आपले सरकार' उपक्रमांतर्गत राज्यभरात 45,000 पेक्षा जास्त 'आपले सरकार सेवा केंद्रां'च्या माध्यमातून देशातील सर्वात मोठे सहाय्यक डिजिटल सेवा जाळे तयार करण्यात आले आहे.

डिजिटल प्रशासनाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचे माध्यम म्हणून ही सेवा केंद्रे कार्यरत आहेत. राज्यातील दुर्गम भागात तसेच गावांमध्ये, आणि शहरी परिसरातही सक्रीय असणारी ही केंद्रे, वरकरणी क्लिष्ट वाटणाऱ्या ऑनलाइन प्रणालीचा वापर करण्यास उत्सुक नसलेल्या नागरिकांना मदतीचा हात देतात आणि शासकीय सेवांचा लाभ सहजपणे मिळवून देतात. वेगवेगळी प्रमाणपत्रे आणि महसूल सेवांबरोबरच कल्याणकारी योजना आणि परवान्यांपर्यंतच्या शेकडो सेवा प्रभावीपणे प्रदान करताना, शासनातर्फे दिले जाणारे लाभ सर्वांपर्यंत पोहोचतील, याची खातरजमा करतात.

आपले सरकार सेवा केंद्रांच्या या विशाल जाळ्याचा सकारात्मक परिणाम दिसून येतो आहे. ही यंत्रणा ज्येष्ठ नागरिक, महिला, शेतकरी, विद्यार्थी आणि आदिवासी समुदाय अशा लाभार्थींना सहजपणे सेवा प्रदान करते आहे, त्यामुळे लाभार्थींना विविध सेवा आणि लाभ प्राप्त करण्यासाठी शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार फेऱ्या माराव्या लागत नाहीत, दूरच्या ठिकाणी असणाऱ्या केंद्रांपर्यंत प्रवास करण्यासाठीचा खर्चही वाचतो आहे. ग्रामस्तरीय उद्योजकांच्या मैत्रीपूर्ण वर्तणुकीमुळे, विशेषतः डिजिटल यंत्रणेचा वापर करणाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आहे, त्यामुळे दुर्गम भागातील नागरिकांचा, शासकीय योजनांचे लाभ मिळण्याचा हक्क अबाधित राहतो आहे. खरे तर 'आपले सरकार' हा मंच एका पोर्टलपुरता मर्यादित राहिलेला नाही, या मंचाने डिजिटल प्रशासनाला खऱ्या अर्थाने तळागाळापर्यंत पोहोचवण्याची किमया केली आहे.

### डिजिटल सेवक

ग्रामस्तरीय उद्योजक (VLEs) हे या श्रृंखलेत 'आपले सरकार' परिसंस्थेच्या केंद्रस्थानी आहेत. राज्याचे 'डिजिटल सेवक' असा त्यांचा उल्लेख केला जातो. निव्वळ केंद्र चालक किंवा संगणक टर्मिनल चालविण्यापुरती त्यांची भूमिका मर्यादित नाही. हे ग्रामस्तरीय उद्योजक ऑनलाइन प्रक्रियांशी अपरिचित असलेल्या नागरिकांसाठी डिजिटल मार्गदर्शक म्हणून काम करतात, त्यांना हव्या असलेल्या सेवांसाठी आवश्यक कागदपत्रे आणि प्रक्रिया समजावून सांगतात. प्राथमिक टप्प्यावर ते नागरिकांकडून प्राप्त कागदपत्रे आणि अर्जांची पडताळणी करतात, आवश्यक दुरुस्ती करतात, पर्यायाने, सादर केलेला अर्ज फेटाळला जाण्याची शक्यता कमी करतात. नागरिकांसाठी दाखल केलेल्या अर्जांसंदर्भातील तक्रारी, त्यांचा पाठपुरावा तसेच सेवा-संबंधित समस्यांसाठी प्रतिसादाचा पहिला संपर्कबिंदू म्हणून ते काम करत आहेत.

नागरिकांशी नियमित संवाद साधणारे हे ग्रामस्तरीय उद्योजक राज्य शासन आणि समाज यांच्यामधला विश्वासार्ह दुवा ठरत आहेत, डिजिटल प्रशासनाला मानवी स्पर्श देत आहेत. जात प्रमाणपत्रे, उत्पन्न आणि अधिवास प्रमाणपत्रे, पेन्शन, शिष्यवृत्ती आणि जमिनीच्या नोंदींसाठीचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरताना ते मदत करतात, आणि त्यायोगे विद्यार्थ्यांचा शिक्षण प्रवेश, समाजातील विविध घटकांचे वित्तीय समावेशन आणि सामाजिक न्याय प्रदान करण्याच्या कामी मोलाची भूमिका बजावतात. 'आपले सरकार' मंचाच्या माध्यमातून सेवा देणारी ही परिसंस्था महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, विशेषतः ग्रामीण भागात हजारो व्हीएलईंसाठी शाश्वत उपजीविकाही प्रदान करते, हे या परिसंस्थेचे मोठे यश म्हणता येईल.

'आपले सरकार' ही केवळ सेवा वितरण करणारी यंत्रणा नाही तर प्रशासनात सुधारणा घडवून सुशासनाला हातभार लावणारे ते एक प्रभावी साधन आहे. डिजिटल स्वरूपातील सार्वजनिक पायाभूत सुविधांना प्रशासकीय पाठबळ आणि मानवी स्पर्शाची जोड दिल्यास राज्याच्या तळागाळातील नागरिकांना कशा प्रकारे लाभ प्रदान करता येतात, हे 'आपले सरकार' उपक्रमाने अतिशय प्रभावीरित्या दाखवून दिले आहे. एकविसाव्या शतकातील तंत्रज्ञान-प्रगत महाराष्ट्र राज्य, सेवा प्रदान करणाऱ्या मंचांचे एकत्रिकरण, एआय-आधारित विश्लेषण आणि प्रभावी सेवा वितरणाची जबाबदारी समर्थपणे पार पाडत असताना, 'आपले सरकार' हा उपक्रम, आणि हा उपक्रम समर्थपणे राबविणारे ग्रामस्तरीय उद्योजक आज राज्य शासन आणि नागरिक यांच्यातील प्रभावी दुवा म्हणून काम करत आहेत, तंत्रज्ञान आणि विश्वासाची सांगड घालून प्रगत महाराष्ट्र घडविण्याच्या कामी आपली भूमिका चोख बजावत आहेत.



# महाआयटीचे लक्ष्य




## समावेशक, कार्यक्षम आणि आधुनिक डिजिटल महाराष्ट्राची निर्मिती

आधुनिक तंत्रज्ञानाचा मुक्त संचार असणाऱ्या आजच्या युगात परिणामकारक प्रशासनासाठी डिजिटल साधनांचा प्रभावी वापर महत्वाचा ठरतो आहे. अशा वेळी 'तंत्रज्ञानप्रगत राज्य' ही आपली ओळख सार्थ ठरवत, राज्याची या क्षेत्रातील आघाडी कायम राखण्याच्या उद्देशाने 'महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित' अर्थात 'महाआयटी' हे महामंडळ महाराष्ट्राच्या ई-प्रशासन आणि डिजिटल सार्वजनिक सेवा प्रणालीचा कणा म्हणून महत्वाची भूमिका बजावत आहे. राज्यातील माहिती-तंत्रज्ञान संबंधित उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि सक्षम ई-प्रशासन यंत्रणा प्रस्थापित करण्यासाठी महाआयटी अव्याहतपणे कार्यरत आहे.

डिजिटलदृष्ट्या सक्षम आणि नागरिक-केंद्रित सुप्रशासित महाराष्ट्र घडविण्याच्या ध्येयाचे प्रतिबिंब महाआयटीच्या परिचालनात ठळकपणे दिसून येते. महाआयटीच्या माध्यमातून राबविले जाणारे विविध उपक्रम राज्याच्या शहरी आणि ग्रामीण भागांमध्ये सामाजिक-आर्थिक विकासासाठी उत्प्रेरक म्हणून उपयुक्त ठरत आहेत. नागरिकांना त्यांच्या सोयीनुसार शासकीय सेवांचा लाभ प्रदान करणारे सुलभ ऑनलाइन मंच महाआयटीतर्फे विकसित केले जात आहेत, अशा मंचांमुळे संपूर्ण राज्यातील, विशेषतः दुर्गम आणि वंचित भागांतील पात्र लाभार्थींपर्यंत शासकीय लाभ खात्रीशिररित्या पोहोचत आहेत.

नवोन्मेषावर आधारित प्रशासन हे महाआयटीच्या ध्येयप्राप्तीचे मुख्य साधन आहे. शासकीय प्रतिसादक्षमता आणि सेवा प्रदान प्रक्रियेची गुणवत्ता वाढवण्यासाठी महाआयटी वेब-आधारित मंच, मोबाइल ॲप्लिकेशन्स आणि एआय-सक्षम साधनांसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा सातत्याने अवलंब करते आहे. त्यामुळे माहिती-तंत्रज्ञान संबंधी सेवा-सुविधांची कार्यक्षमता, डेटाचे एकात्मिकरण आणि उपयुक्त सार्वजनिक डिजिटल मंचांची उपलब्धता शक्य झाली आहे.

प्रगत माहिती-तंत्रज्ञानाचा अवलंब करत सार्वजनिक हिताचे अंतिम लक्ष्य समोर ठेवून महाआयटीची आगेकूच सुरू आहे. महाआयटीने विकसित केलेल्या 'आपले सरकार' या नागरिक-केंद्रित पोर्टलवर 500 पेक्षा जास्त शासकीय सेवा आणि प्रमाणपत्रे ऑनलाइन उपलब्ध आहेत. त्याचबरोबर महाआयटीतर्फे विविध शासकीय विभागांना माहिती तंत्रज्ञान सेवा, तांत्रिक मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधा प्रदान केल्या जातात, त्यामुळे सेवा-सुविधांशी संबंधित प्रक्रियांचे आधुनिकीकरण शक्य होते, आणि या प्रक्रियेत नागरिकांचा सहभागही वाढतो.

राज्याच्या कानाकोपऱ्यातील भागांना इंटरनेटने जोडण्यासाठी राबविण्यात येणारा भारतनेट प्रकल्प महाराष्ट्रात महाआयटीमार्फत राबवला जातो आहे. शासकीय सहाय्य लाभार्थींच्या खाती जमा करणाऱ्या थेट लाभ हस्तांतरण (DBT) योजनेची यशस्वी अंमलबजावणी करणारे महाआयटी हे महामंडळ राज्य शासनाच्या विविध विभागांसाठी कल्पक संकेतस्थळे आणि पोर्टल्ससुद्धा विकसित करते आहे.

राज्यात प्रभावी सार्वजनिक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे, नागरिकांचा समावेश वाढवणे आणि शासनाची सुरक्षित क्लाउड प्रणाली विकसित करण्यावर महाआयटीने लक्ष केंद्रित केले आहे. जिल्ह्यातील माहिती-तंत्रज्ञान कक्ष, राज्य शासनाचे विभाग आणि खाजगी भागीदारांसोबत काम करण्याच्या महाआयटीच्या समावेशक दृष्टिकोनामुळे तंत्रज्ञानाधारित उपाययोजना तळागाळापर्यंत वेळेत पोहोचत आहेत. वेगवान प्रशासनाप्रती आपली वचनबद्धता जपणाऱ्या महाआयटीने सेवा हक्क अधिनियमांतर्गत (आरटीएस) सर्व शासकीय सेवा ऑनलाइन आणण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निर्धारित केले आहे. नाविन्याची कास धरून सर्वसमावेशक परिवर्तनात सिंहाचा वाटा उचलणारे 'महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ' महाराष्ट्राच्या डिजिटल परिवर्तनाला खऱ्या अर्थाने आकार देत आहे.

# थेट लाभ हस्तांतरणाचा प्रवास



## महाराष्ट्रातील कल्याणकारी योजनांचे लाभ मिळू लागले विनासायास

कृषीप्रधान राज्य अशी ओळख असणाऱ्या महाराष्ट्रातल्या बीड जिल्ह्यातले रमेश जाधव हे राज्यातले एक प्रातिनिधिक शेतकरी. दुष्काळग्रस्त गावातले रमेश जाधव हे तीन एकर जमिनीचे मालक असले तरी पावसाच्या लहरीपणाची तलवार त्यांच्या डोक्यावर सतत टांगलेली असे. शेतीसाठी लागणाऱ्या अवजारांची कशीतरी सोय करून लागवड केली तरी निसर्गाच्या लहरीमुळे हाती पीक येईल, याची शाश्वती नसे. कापूस, ज्वारी, बाजरी आणि सोयाबीनची लागवड करणारे 51 वर्षीय रमेश जाधव, ठिबक सिंचन आणि शेतीसाठी लागणारी अवजारे विकत घेण्याच्या उद्देशाने शासकीय अनुदानाचा लाभ घेण्यासाठी अर्ज करत, परंतु त्यासाठीची प्रक्रिया खूपच संथ आणि अनिश्चित होती. वर्षानुवर्षे ते अर्ज करत, तो अर्ज अनेक कार्यालयांमध्ये फिरत राही, वारंवार वेगवेगळी कागदपत्रे मागितली जात आणि त्यानंतरही अनुदान मंजूर झाले, तर बहुतेकदा ते हंगाम संपल्यानंतरच मिळत असे.

रमेश जाधव यांनी महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज केला, तेव्हा मात्र ही परिस्थिती बदलली. कृषी अनुदानासाठीचा त्यांचा अर्ज नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रामार्फत ग्रामस्तरीय उद्योजकाच्या मदतीने ऑनलाइन सादर करण्यात आला. आधार-आधारित प्रमाणीकरण आणि बँक खाते संलग्न करण्यात आले. प्रत्येक टप्प्यावर त्यांना आपल्या अर्जाच्या सद्यस्थितीचा मागोवा घेता येत होता. लवकरच त्यांचा अर्ज मंजुर झाला आणि काही आठवड्यांतच अनुदानाची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा झाली.

वेळेवर मिळालेल्या अर्थसहाय्यामुळे रमेश जाधव यांना पेरणीपूर्वी सिंचनासाठी आवश्यक उपकरणांची तरतूद करता आली आणि पहिल्यांदाच वेळेत मिळालेली सरकारी मदत खऱ्या अर्थाने उपयुक्त ठरली. या सुखद अनुभवानंतर आता ते आणखी आत्मविश्वासाने शेतीसंबंधी कामांचे नियोजन करू लागले आहेत. महाराष्ट्रातल्या अशा असंख्य शेतकऱ्यांच्या समस्या महाडीबीटीमुळे चुटकीसरशी सुटल्या आहेत, परिणामी शासकीय योजना आणि यंत्रणेवरचा शेतकऱ्यांचा विश्वास वाढीला लागला आहे. वेळेत लाभ न मिळण्याच्या प्रमाणात लक्षणीय घट झाल्यामुळे शेतकऱ्यांवरचा ताण कमी झाला आहे, आणि त्यांची उत्पादकताही सुधारली आहे.

सोलापूरमधील एका लहान शहरात आपल्या वृद्ध आईसोबत राहणाऱ्या सुनीता पवार या दिव्यांग आहेत. शारीरिक मर्यादांमुळे शासकीय कार्यालयांना वारंवार भेट देणे त्यांच्यासाठी त्रासाचे असले तरी दिव्यांग पेन्शन आणि सहाय्य योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांना हा त्रास सोसावाच लागे. कार्यालयात गेल्यानंतरही रांगेत उभे राहावे लागत असे आणि आपल्या अर्जाची स्थिती जाणून घेण्यासाठी इतरांवर अवलंबून राहावे लागत असे. अशा परिस्थितीत सर्वसामान्य नागरिकांसाठी सुरू करण्यात आलेले महाडीबीटी पोर्टल त्यांच्यासाठी वरदान ठरले. जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात ऑनलाइन नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण करता आले. दिव्यांग पेन्शन आणि सहाय्यासाठी ऑनलाईन अर्ज भरून डिजिटल प्रक्रिया पूर्ण झाली, आणि मंजुरी मिळाल्यानंतर त्यांची मासिक पेन्शन अगदी सहज आणि थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होऊ लागली.

महाडीबीटी पोर्टलमुळे प्राप्त झालेल्या या सुविधेचा परिणाम केवळ पैशांपुरता मर्यादित नव्हता. नियमित आणि निश्चित आर्थिक सहाय्य मिळत असल्यामुळे सुनीता पवार यांना घरातील खर्चाला हातभार लावणे आणि आपल्या आरोग्यसंबंधी खर्चाचे नियोजन करणेही शक्य झाले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शासनातर्फे दिले जाणारे लाभ प्राप्त करण्यासाठी कोणावर अवलंबून राहण्याची गरज संपली. या कारणासाठी प्रवास करण्यापासून ते रांगा लावण्यापर्यंतच्या त्रासातूनही त्यांची सुटका झाली. महाडीबीटीने त्यांना आर्थिक मदतीबरोबरच सन्मानाचे जगणेही भेट दिले.

शासकीय लाभांचे थेट हस्तांतरण करणाऱ्या महाडीबीटी पोर्टलने सुनितासारख्या महाराष्ट्रातील हजारो दिव्यांग नागरिकांची अर्ज-

प्रक्रियेच्या मोठ्या त्रासातून सुटका केली आहे आणि त्यांचे हक्काचे लाभ सन्मानाने आणि विश्वासाने त्यांच्यापर्यंत पोहोचवले आहेत.

नंदुरबार जिल्ह्यातली आयेशा शेख ही तिच्या कुटुंबातील पहिलीच उच्चशिक्षित व्यक्ती आहे. नंदुरबारच्या आदिवासीबहुल भागात राहणाऱ्या आयेशाच्या लेखी, पदवी प्राप्त करण्यासाठी महाविद्यालयात प्रवेश करणे, हे खरे तर स्वप्नवत होते. कुटुंबाच्या मर्यादित उत्पन्नामुळे पदवीचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी भरावे लागणारे शिक्षण शुल्क, वसतिगृह शुल्क आणि अभ्यासाचा खर्च कसा परवडणार, हा प्रश्न त्यांच्यासमोर होता.

शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी शासनाने शिष्यवृत्तींची तरतूद केली असली तरी त्यासाठीची अर्ज प्रक्रिया सोपी वाटत नव्हती. त्यासाठीच्या प्रणाली अपारदर्शक आणि संथ वाटत होत्या. शिष्यवृत्ती मंजुर होऊन प्रत्यक्ष रक्कम हाती येण्यात लागणाऱ्या विलंबामुळे विद्यार्थ्यांना अनेकदा पैसे उधार घ्यावे लागत, अनेकांना काही काळासाठी शिक्षण थांबवावे सुद्धा लागत असे. महाडीबीटी पोर्टलवरून आयेशाने पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्तीसाठी ऑनलाइन अर्ज केला. आधार-संलग्न तपशिलांमुळे तिचे अर्ज प्रक्रियेचे काम आणखी सोपे झाले आणि अर्ज सादर करण्यापासून ते मंजुरीपर्यंतचा मागोवासुद्धा अगदी सहजपणे घेता आला.

महाविद्यालयात शुल्क भरण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी शिष्यवृत्तीची रक्कम थेट आयेशाच्या बँक खात्यात जमा झाली, आणि तिचे शिक्षण अखंडपणे सुरू राहिले. आज आयेशा आत्मविश्वासाने आपला अभ्यासक्रम पूर्ण करत आहे, उच्च शिक्षण घेते आहे आणि कोणत्याही ताणाशिवाय केवळ अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे तिला शक्य झाले आहे.

आयेशासारख्या विद्यार्थ्यांसाठी, विशेषतः मुली, अल्पसंख्याक, आदिवासी युवा आणि औपचारिक शिक्षण व्यवस्थेत पहिल्यांदाच प्रवेश करणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी हे एक उपयुक्त माध्यम ठरते आहे. शिष्यवृत्ती वेळेवर मिळत असल्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षण अर्धवट सोडण्याचे प्रमाण कमी झाले आहे, आणि सामाजिक प्रगतीचा मार्ग म्हणून शिक्षणावरील विश्वास आणखी दृढ झाला आहे.

## सक्षमीकरणाचा समान धागा

कृषी, सामाजिक न्याय आणि शिक्षण अशा विविध क्षेत्रांमधले हे सर्व लाभार्थी, शासनाच्या सक्षमीकरण मोहिमांचे सार्थ लाभधारक आहेत. शासनाच्या विविध विभागांमार्फत दिले जाणारे लाभ प्राप्त करण्यासाठीच्या बहुविध मंचांची आणि पर्यायाने तितक्याच बहुविध प्रक्रियांचा जागा महाडीबीटी या सामायिक, पारदर्शक आणि जबाबदार डिजिटल मंचाने घेतली आहे. तब्बल 14 विभागांच्या 93 योजनांचे एकत्रिकरण या मंचावर करण्यात आले असून त्यामार्फत सुमारे 5 कोटी लाभार्थ्यांना 65,297 कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे थेट वितरण करण्यात आले आहे. तंत्रज्ञानाला कौशल्याची जोड देत शासकीय लाभ योग्य लाभार्थींपर्यंत थेट पोहोचविण्याच्या कामी हा मंच प्रभावी कामगिरी करत असल्याचे सिद्ध झाले आहे.

महाडीबीटी पोर्टलवर आधार प्रमाणीकरणामुळे लाभार्थी बनावट नसल्याची खातरजमा होते, तर बँक-संलग्न हस्तांतरणामुळे निधीची गळती आणि प्रदानातील विलंब टाळणे शक्य होते. महाआयटीने विकसित केलेल्या या महाडीबीटी पोर्टलचा वापर करून आपले सरकार सेवा केंद्रांच्या माध्यमातून ग्रामस्तरीय उद्योजक योग्य लाभार्थींच्या खाती लाभाची रक्कम जमा व्हावी, यासाठी पुरेपूर प्रयत्न करतात. त्यामुळे शासकीय योजनांचे लाभ ग्रामीण, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि डिजिटल साक्षर नसलेल्या नागरिकांनाही विनासायास मिळत आहेत.

महाराष्ट्राच्या या डिजिटल प्रवासात, शासनातर्फे नागरिकांना दिले जाणारे लाभ सातत्याने मिळत राहतील, याचा दिलासा देण्यासाठी महाडीबीटी मंच अविरतपणे कार्यरत आहे. नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून तंत्रज्ञानाधारित मंच तयार केले जातात, तेव्हा सुशासनाला मानवी स्पर्श लाभतो, ते अधिक कार्यक्षम आणि विश्वासार्ह होते, हे या पोर्टलने दाखवून दिले आहे.

**महाराष्ट्रातील थेट लाभ हस्तांतरण योजनेची सद्यस्थिती**

| अ.क्र. | विभाग आणि योजना प्रकार | कालावधी | मंजूर लाभार्थी (कोटी) | संवितरण (कोटी) |
|---|---|---|---|---|
| १ | मॅट्रिकोत्तर योजना (१२ विभाग) | २०१८-२०२५ | १.९८ | ₹ ३८,६८२.०० |
| २.१ | कृषी - डीबीटी योजना | २०२०-२०२५ | ०.२ | ₹ ७,२५२.०० |
| २.२ | कृषी - नमो शेतकरी | २०२३-२०२५ | ०.९ | ₹ ११,११०.०० |
| २.३ | कृषी - कापूस आणि सोयाबिन | २०२४-२०२५ | ०.७३ | ₹ २,८०४.०० |
| ३ | वन - सौर कुंपण योजना | २०२४-२०२५ | ०.००१३ | ₹ १७.०० |
| ४ | सांस्कृतिक - वयोवृद्ध कलाकार मानधन | २०२४-२०२५ | ०.००२५ | ₹ २३४.३८ |
| ५ | एसजेएसए - मुख्यमंत्री वयोश्री | २०२४-२०२५ | ०.०९ | ₹ २४३.०० |
| ६ | एसए एसए - विशेष सहाय्य | २०२४-२०२५ | ०.४३ | ₹ ४,७०१.०० |
| ७ | कौशल्य विकास विभाग - एमएपीएस योजना | २०२४-२०२५ | ०.००७५ | ₹ २५४.०० |
| | ऑनलाईन योजना | | ~५ | ६५,२९७ |



# घरोघरी आधार: अहिल्यानगरमध्ये 3,000 बालकांचे डिजिटल समावेशन

अहिल्यानगर जिल्ह्यातील दुर्गम गावांमधल्या अंगणवाडी केंद्रांमध्ये आयोजित आधार नोंदणी शिबिरांमुळे सुमारे 3,000 बालकांचे तपशील या औपचारिक डिजिटल प्रणालीमध्ये समाविष्ट झाले. ग्रामस्तरीय उद्योजकांनी 'आपले सरकार सेवा केंद्रांच्या माध्यमातून या शिबिरांचे आयोजन केले, आणि त्यांच्या समर्पित प्रयत्नांमुळे हा उपक्रम राज्याच्या कानाकोपऱ्यापर्यंतच्या डिजिटल सक्षमीकरणाचे एक प्रभावी उदाहरण ठरला आहे.

योग्य माहितीचा अभाव, नोंदणीसाठी केंद्रापर्यंत पोहोचण्यासाठी करावा लागणारा प्रवास आणि त्यासाठी होणारा खर्च अशा बहुविध कारणांमुळे जिल्ह्यातील ग्रामीण आणि आदिवासी भागांमधल्या अनेक पालकांनी आपल्या मुलांची आधार नोंदणी केली नव्हती. या कारणांची दखल घेत नजिकच्या परिसरातील अंगणवाड्यांमध्येच नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले, आणि आधार नोंदणी पासून वंचित राहिलेल्या आबालवृद्धांना आधारच्या कक्षेत सामावून घेण्यात आले.

राहाता तालुक्यातील पिंपरी लोकाई येथील ग्रामपंचायत कार्यालयात, ग्रामस्तरीय उद्योजक सतीश बाबासाहेब भरसाकळ यांनी अंगणवाडी सेविकांशी समन्वय साधत, प्रकल्प राहाता, गट राहाता अंतर्गत आधार नोंदणी उपक्रमांचे नेतृत्व केले. तर अकोले तालुक्यात प्रकल्प अकोले, गट खिरविरे या दुर्गम भागात कुंदन चांगदेव कोर्डे या ग्रामस्तरीय उद्योजकाने केली आणि रुम्हणवाडी अंगणवाडीत आधार शिबिराचे यशस्वी आयोजन केले.

नंदलाल कारभारी थांगे यांनी नगर तालुक्यात प्रकल्प नगर ग्रामीण 1, गट चास अंतर्गत भोयरे पठार खुर्द अंगणवाडीत आधार नोंदणी शिबिराचे आयोजन केले, तर वैभव साहेबराव चव्हाण यांनी प्रकल्प नगर ग्रामीण 2, गट बुरहाननगर अंतर्गत बुरहाननगर अंगणवाडीत या मोहिमेचे नेतृत्व केले. या सामूहिक प्रयत्नांमुळे जिल्ह्यातील अनेक बालकांची आधार नोंदणी शक्य झाली. या उपक्रमाच्या यशाबाबत लाभार्थींच्या प्रतिक्रिया पुरेशा बोलक्या आहेत.

"मुले मोठी झाल्यानंतरच आधार क्रमांकाची गरज असते, असे आम्हाला आधी वाटत होते. मात्र या शिबिरात नोंदणी झाल्यामुळे आता माझ्या दोन वर्षांच्या मुलाकडेही आधार क्रमांक आहे. त्यामुळे त्याला यापुढे कोणत्याही शासकीय लाभापासून वंचित राहावे लागणार नाही, अशी खात्री मला वाटते," असे पिंपरी लोकाई येथील सुनीता पवार यांनी सांगितले.

रुम्हणवाडी येथील रोजंदारीवर काम करणारे रमेश कोर्डे म्हणाले "आधार नोंदणी करण्यासाठी आम्हाला दूर प्रवास करावा लागला नाहीच आणि दिवसाची मजुरी सुद्धा गमवावी लागली नाही. शिबिर आमच्या अंगणवाडीतच होते, आणि नोंदणीचे कामही झटपट झाले." भोयरे पाथर येथील लाभार्थी मीना थांगे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, "आधारमुळे माझ्या मुलीच्या आरोग्याच्या नोंदी आणि पोषणविषयक लाभांचा योग्य प्रकारे मागोवा घेतला जातो. यामुळे आम्हाला मुलीच्या आरोग्याबद्दल काळजी करावी लागत नाही."

अंगणवाड्यांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या आधार नोंदणी मोहिमेचा लाभ घेणाऱ्या बालकांना यापुढे एकात्मिक बाल विकास सेवा योजना, आरोग्य निरीक्षण आणि भविष्यातील थेट लाभ हस्तांतरण योजनांचे लाभ मिळत राहणार आहेत. मोहिमेतल्या नोंदणीच्या निव्वळ आकडेवारीच्या पलिकडे जाऊन विचार केला तर या उपक्रमाने लाभार्थी नागरिकांना सन्मानाने आणि सुलभरित्या शासकीय लाभ मिळत राहतील, याची खातरजमा केली आहे. आपले सरकार सेवा केंद्र आणि डिजिटल सेवक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रामस्तरीय उद्योजकांनी राबविलेल्या या उपक्रमामुळे, डिजिटल महाराष्ट्राच्या वेगवान प्रवासात राज्याच्या तळागाळातील जनताही शासकीय लाभांपासून वंचित राहणार नाहीत, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# सक्षमीकरणाच्या वाटेवर



## दिव्यांगत्वापासून नेतृत्वापर्यंतची यशस्वी वाटचाल

शासकीय सेवा सर्वसमावेशक असल्या पाहिजेत, या तत्वाचा अंगिकार करत, सर्वसामान्य नागरिकांबरोबरच समाजातील काहीशा उपेक्षित असणाऱ्या तृतीयपंथियांनाही या सेवांचा लाभ प्रदान करण्याच्या कामी पुढाकार घेणाऱ्या, पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातल्या राजगुरूनगर गावातल्या शुभांगी शिंदे-शेख यांनी आपल्या कार्यातून एक नवा आदर्श घालून दिला आहे. दिव्यांग असणाऱ्या शुभांगीताईंना या कामी, त्यांचे पती युसूफ शेख आणि मुलगा अरमान शेख यांचीही उत्तम साथ लाभते आहे, हे विशेष.

राजगुरूनगर गावात महा ई सेवा केंद्र चालवणाऱ्या शुभांगी शिंदे शेख यांनी सुरुवातीपासूनच सर्वसमावेशकतेवर भर दिला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या कुटुंबातील शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मुलांना शिक्षण सुरु ठेवण्यासाठी शासकीय योजनांचा लाभ घ्यायचा असला तर त्यासाठी अर्ज करताना जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला किती महत्वाचा असतो, हे त्या जाणतात, आणि हे दाखले वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करतात. अर्ज अचूकपणे भरणे, तपशिलांची योग्य नोंद करणे, विहित कालावधीत प्रमाणपत्र प्राप्त करणे या सगळ्या टप्प्यांवर दक्ष राहून त्या आपले कर्तव्य बजावतात.

शुभांगी ताईंमुळे माझ्या मुलीला वेळेवर जातीचा दाखला मिळाला आणि तिची वसतिगृहातील जागा निश्चित झाली. त्यांनी आमच्या मुलीचे भविष्य वाचवले", अशा शब्दांत भगवान वैतागडे नावाच्या आदिवासी बांधवाने आपल्या भावना व्यक्त केल्या.

हे केंद्र महिला आणि वृद्धांसाठीही वरदान ठरते आहे. पात्र लाभार्थींना संजय गांधी निराधार पेन्शन योजना, जीवन प्रमाण, आधार सेवा, रेशन कार्ड, पॅन कार्ड आणि इतर आवश्यक प्रमाणपत्रे वेळेत मिळावीत, याची खातरजमा शुभांगीताई करतात. या संदर्भात सावित्रीबाई नावाच्या वयोवृद्ध लाभार्थी महिलेचा अनुभव बोलका आहे. त्या म्हणाल्या, "माझी पेन्शन थांबली होती. कागदपत्रे जिथे जमा करायची, त्या कार्यालयापर्यंत मी चालत जाऊ शकत नव्हते. शुभांगी ताईंनी इथेच सर्व काम पूर्ण केले आणि माझी पेन्शन पुन्हा सुरु झाली. शुभांगीताईंचे काम हे आमच्यासाठी खरोखरच वरदान आहे."

तृतीयपंथी समुदायासाठी त्यांनी घेतलेला पुढाकारसुद्धा लक्षणीय आहे. शुभांगी आणि युसूफ या दाम्पत्याने अगदी तुटपुंजी कागदपत्रे असणाऱ्या तब्बल 172 तृतीयपंथी व्यक्तींना आपल्या महा ई सेवा केंद्रामार्फत अर्ज भरुन, आधार आणि पॅन कार्ड मिळवून देण्यास मदत केली. यामुळे त्यांना ओळख मिळाली, बँक खाती उघडता आली, आणि सरकारी पेन्शनचा लाभ घेणे शक्य झाले. "आम्हाला पहिल्यांदाच नागरिक म्हणून वागवले गेले. शुभांगीताईंने आमच्याबद्दल कोणताही पूर्वग्रह ठेवला नाही, ती नेहमीच आमच्यासोबत ठामपणे उभी राहिली," असे राणी नावाच्या लाभार्थीने सांगितले.

आज संपूर्ण तालुक्यात शुभांगीताईंना "आधार (कार्ड) देणाऱ्या आधार मॅडम" अशी अनोखी ओळख लाभली आहे. त्यांच्या शारीरिक मर्यादांमुळे आव्हाने निर्माण झाली, तेव्हा त्यांचे पती युसूफ त्यांच्या पाठीशी उभे राहिले. शुभांगीताई कामकाज, दस्तऐवजीकरण आणि नागरिकांना मदत करण्याची जबाबदारी सांभाळत असताना शारीरिक हालचालींशी संबंधित सगळ्या कामांचा भार त्यांचे पती युसुफ तितक्याच समर्थपणे पेलत आहेत. सेवा केंद्रांच्या माध्यमातून लाभार्थींना सेवा प्रदान करत असतानाच शुभांगीताईंसारख्या महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची ही किमया महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाने (महाआयटी) विकसित केलेल्या डिजिटल पायाभूत सुविधांमुळेच शक्य झाली आहे. रोजगार नसल्याचे रडगाणे न गाता शुभांगीताईंनी महा ई-सेवा केंद्र सुरु करण्याचा निर्णय घेतला, त्यांच्या कुटुंबांनेही त्यांना भरभक्कम साथ दिली आणि जिद्दीचा, सन्मानाने जगण्याचा त्यांचा हा प्रवास त्यांच्याबरोबरच अनेक ग्रामस्थांचे जगणे सुकर करु लागला आहे.



# वंचनेपासून समावेशनापर्यंतचा प्रवास: परभणी जिल्ह्यातील दुर्गम गावाचे डिजिटल परिवर्तन

संतोष केकरजवळेकर हे महाराष्ट्राच्या परभणी जिल्ह्यातल्या मानवत तालुक्यामधल्या केकरजवळा या गावचे रहिवासी. महाआयटीचे व्हीएलई असणारे संतोष केकरजवळेकर चालवत असणारे 'आपले सरकार सेवा केंद्र' मराठवाड्यातल्या या दुर्गम गावातील नागरिकांसाठी वरदान ठरले आहे. राज्यातील हजारो केंद्रांपैकी एक इतकीच या केंद्राची ओळख नाही, तर ग्रामीण सक्षमीकरणाचे एक शक्तिशाली माध्यम असणारे हे केंद्र नागरिकांना सुशासन, सन्मान आणि संधी थेट घरपोच प्रदान करते आहे.

केकरजवळा गावात हे 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू होण्यापूर्वी, गावकऱ्यांना कोणत्याही शासकीय प्रमाणपत्रासाठी 25 ते 30 किलोमीटर अंतरावर असणाऱ्या तालुका कार्यालयापर्यंत प्रवास करावा लागत होता. प्रमाणपत्रासाठी तालुक्याच्या ठिकाणी जायचे असले की सांपत्तिक स्थिती यथातथा असणाऱ्या इथल्या रहिवाशांना रोजच्या मजुरीवर पाणी सोडावे लागत असे. प्रवासासाठी लागणारा खर्च, पुरेशी कागदपत्रे सोबत नेलेली नसल्यामुळे किंवा तिथल्या कार्यालयातील समस्यांमुळे पुन्हा पुन्हा माराव्या लागणाऱ्या फेऱ्या, यामुळे इथले रहिवासी त्रासून जात. नागरिकांसाठी सरकारने अनेक लाभ देऊ केले असले तरी ते प्राप्त करण्यातील अशा अडथळ्यांमुळे सर्वसामान्य नागरिक, विशेषत: वृद्ध, महिला, विद्यार्थी आणि लहान शेतकरी अशा अनेक लाभांपासून वंचित राहत होते.
आता मात्र ही परिस्थिती बदलली आहे. संतोष केकरजवळेकर चालवत असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रामुळे गावातील रहिवाशांना पॅन कार्ड, आधार-संलग्न सेवा, उत्पन्नाचे दाखले, जातीचे दाखले, रहिवासी दाखले, नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्रे अशा अनेक सेवा गावातच उपलब्ध झाल्या आहेत.

यासंदर्भात सुनीता जाधव यांचे उदाहरण अगदी बोलके आहे. सुनीता जाधव या अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातल्या महिलेच्या मुलीला परभणी येथील महाविद्यालयात प्रवेश मिळाला खरा, परंतु शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी त्यांना जातीचा दाखला आणि नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्र लवकरात लवकर सादर करावे लागणार होते. अशा वेळी संतोष केकरजवळेकर यांनी त्यांना मदतीचा हात दिला. सुनिता जाधव म्हणतात, "या प्रमाणपत्रांसाठी कार्यालयात फेऱ्या मारणे आम्हाला शक्य नव्हते, तेवढा वेळ सुद्धा नव्हता. ही प्रमाणपत्रे ऑनलाईन मिळवून देण्यासाठी संतोषजींनी आम्हाला मदत केली. प्रमाणपत्रे वेळेत मिळाल्यामुळेच माझ्या मुलीचा महाविद्यालय प्रवेश निश्चित झाला आणि शिष्यवृत्तीचाही लाभ मिळाला."

अचानक ओढवलेल्या वैद्यकीय आपत्तीच्या काळात, आपले सरकार सेवा केंद्रामधून मिळालेल्या उत्पन्नाच्या दाखल्यामुळे वैद्यकीय उपचारांमध्ये मिळालेल्या सवलतींबद्दल रमेश पवार या शेतकऱ्याने कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. "सरकारी कामांची, अर्जांची आम्हाला आधी भीती वाटत असे. आता शासनातर्फे दिले जाणारे लाभ मिळवण्यासाठी आम्हाला कुठे जायचे आहे आणि कोणावर विश्वास ठेवायचा आहे, हे माहिती आहे," असे ते म्हणतात.

या गावात आपले सरकार सेवा केंद्र चालवणारे संतोष केकरजवळेकर यांची भूमिका डिजिटल सेवा पुरवण्यापुरतीच मर्यादित नाही. आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून संतोष केकरजवळेकर केवळ अर्ज प्रक्रियाच पूर्ण करत नाहीत, तर ते संपूर्ण प्रक्रिया सोप्या भाषेत समजावून सांगतात, कागदपत्रे काळजीपूर्वक तपासतात आणि सेवा मिळेपर्यंत पाठपुरावा सुद्धा करतात. पहिल्यांदाच डिजिटल सेवा वापरणाऱ्यांना ते आपुलकीने मदत करतात, वृद्ध नागरिकांना ऑनलाइन प्रणाली वापरायला शिकवतात आणि अर्जांत त्रुटी राहणार नाहीत, याची खातरजमा करतात, त्यामुळे अर्ज नाकारले जाण्याचे आणि सेवा विलंबाने प्राप्त होण्याचे प्रमाण कमी होते. त्यांच्या सेवावृत्तीने नागरिकांच्या मनात डिजिटल प्रशासनाबद्दल विश्वासाची भावना निर्माण केली आहे.

# सेवा वितरणातील प्रभाव



## प्रमाणपत्रांपासून आत्मविश्वासापर्यंत... महाराष्ट्रातील घराघरात आपले सरकार प्रतिष्ठा निर्माण करत आहे!

काम करणाऱ्या तिच्या आई वडिलांना दिवसाच्या कामाचा खाडा करून तालुक्याच्या ठिकाणी अर्ज भरायला जाणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नव्हते. या दोन प्रमाणपत्रांमुळे आपल्या मुलीचे शिक्षण धोक्यात येण्याची भीती होती. त्याचवेळी सुनिताला आपल्या गावात आपले सरकार सेवा केंद्र सुरू असून सदर कागदपत्रे तिथे काढून मिळत असल्याची माहिती मिळाली. तिने आपले सरकार सेवा केंद्राला भेट देऊन तिथे ऑनलाईन अर्ज भरला. अर्जासाठी असणारे शुल्क ऑनलाइन भरण्याची सुविधा केंद्रावर उपलब्ध होती. अधिसूचित वेळेत, तिचे डिजिटल प्रमाणपत्र तिला घरपोच मिळाले. ज्यामुळे ती वेळेवर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू शकली आणि तिला आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी पुढे शिक्षण सुरू ठेवण्यास कोणतीही अडचण आली नाही.

नागरिकांसाठी जात, उत्पन्न, अधिवास यासारखी प्रमाणपत्रे ही नेहमीची कागदपत्रे असतात. बहुतेक वेळा ती सर्व प्रकारच्या सरकारी कामासाठी आवश्यक असतात. महाराष्ट्रातील ग्रामीण, आदिवासी आणि उपेक्षित कुटुंबांसाठी ही प्रमाणपत्रे सक्षमीकरणासाठी प्रवेशद्वार म्हणून काम करतात. ही प्रमाणपत्रे शिक्षण, कल्याणकारी योजना, आरक्षण, पेन्शन, बँक खाती आणि थेट लाभ हस्तांतरण (DBT) योजनांसाठी आवश्यक असतात. ही वास्तविकता ओळखून महाआयटीने विकसित केलेल्या आपले सरकार पोर्टलने या महत्त्वाच्या सेवा वितरणाचा पॅटर्न बदलून टाकला आहे. राज्यव्यापी सेवा नेटवर्कसह एक मजबूत डिजिटल प्लॅटफॉर्म एकत्रित करून राज्यात या केंद्रांनी नागरिकांच्या आयुष्यात खूप मोठा बदल घडवून आणला आहे.

यापूर्वी जात किंवा महसूल प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अनेकदा सरकारी कार्यालयांना वारंवार भेटी द्याव्या लागत होत्या, अनौपचारिक मध्यस्थांवर अवलंबून राहावे लागत होते, पैसे किती लागतील हेही कळत नसे आणि शिवाय प्रमाणपत्र कधी मिळेल याची कोणतीही निश्चित वेळ नव्हती. ही अडचण प्रशासकीय केंद्रांपासून दूर राहणारे आदिवासी समुदाय आणि कागदपत्रांची आवश्यकता किंवा ऑनलाइन प्रणालींशी अपरिचित नागरिक यांना मोठ्या प्रमाणावर यायची. विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची अंतिम मुदत चुकणे, वृद्धांसाठी पेन्शनला विलंब, डीबीटीशी संबंधित कल्याणकारी योजनांमधून वगळणे आणि कामानिमित्त वारंवार सरकारी कार्यालयात जावे लागत असल्यामुळे आर्थिक नुकसान देखील होत असे.

आपले सरकार उपक्रम राज्यभरातील हजारो भौतिक संपर्क बिंदूंद्वारे समर्पित सिंगल-विंडो डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे या आव्हानांना तोंड देतो. नागरिक थेट ऑनलाइन अर्ज करू शकतात किंवा जवळच्या आपले सरकार सेवा केंद्राला भेट देऊ शकतात, जिथे प्रशिक्षित डिजिटल सेवक अर्ज भरण्यास, कागदपत्रे अपलोड करण्यास मदत करतात. कोणत्या प्रमाणपत्रासाठी कोणकोणती कागदपत्र लागतात याचा स्पष्ट उल्लेख आपले सरकार सेवा केंद्रावर असतो. या प्रक्रियेत नागरिकांना डिजिटल पेमेंट करण्याची सोय उपलब्ध असून त्यांच्या अर्जांची स्थिती देखील ट्रॅक करू शकतात. बारकोड आधारित प्रमाणपत्रे आणि बॅकएंड पडताळणी यंत्रणा यासारख्या सुरक्षित वैशिष्ट्यांमुळे सत्यता आणि सुनिश्चितता होऊन फसवणूक कमी होते आणि प्रमाणपत्रे सर्व विभागांमध्ये सार्वत्रिकपणे स्वीकार्य होतात. या प्रणालीचा परिणाम दैनंदिन जीवनात दिसून येतो.

बीड जिल्ह्यातील वृद्ध शेतकरी शंकर पाटील यांना वृद्धापकाळ पेन्शन मिळविण्यासाठी उत्पन्नाचा दाखला आवश्यक होता. पूर्वी यासाठी संपूर्ण दिवस तालुक्याच्या ठिकाणी खर्च करावा लागत असे. ज्यामुळे त्यांच्या दैनंदिन कामावर परिणाम होऊन आर्थिक फटका बसत असे. पण आपले सरकार सेवा केंद्रामुळे त्यांचा अर्ज स्थानिक पातळीवर दाखल होऊन ऑनलाइन ट्रॅक केला जात आहे आणि निर्धारित वेळेत मंजूर देखील केला जात आहे. शंकर पाटील सांगतात, "मला कोणाच्या मागे धावावे लागले नाही, काम कधी पूर्ण होईल हे मला माहित होते". जारी केलेल्या प्रमाणपत्रामुळे त्यांचे पेन्शन डीबीटीद्वारे प्रक्रिया करणे शक्य झाले, ज्यामुळे वेळेवर आर्थिक मदत मिळत आहे.

धुळे जिल्ह्यातील आदिवासी महिला पावरा यांच्या मते, अधिवास प्रमाणपत्र वेळेवर जारी केल्याने त्यांची मुलगी शेवटच्या क्षणी ताण न घेता महाविद्यालयीन प्रवेशादरम्यान आरक्षणाचे फायदे मिळवू शकली. एकदा जारी झाल्यानंतर, प्रमाणपत्र शिष्यवृत्ती आणि डीबीटी प्रणालींशी अखंडपणे जोडले गेले, ज्यामुळे अतिरिक्त कागदपत्रांशिवाय कुटुंबाच्या आधारशी जोडलेल्या बँक खात्यात लाभ पोहोचू शकले. मर्यादित संसाधने असलेल्या कुटुंबांसाठी ही बाब आयुष्यात खूप मोठा बदल घडवून आणणारी असते.

एकत्रितपणे, या कथा आपले सरकार मॉडेलच्या तीन मुख्य परिणामांवर प्रकाश टाकतात: प्रवेश, पारदर्शकता आणि वेग. प्रथम, स्थानिक सेवेची उपस्थिती केंद्रांमुळे प्रवास खर्चात लक्षणीय घट होते आणि सेवा गावांच्या जवळ येतात. विशेषतः आदिवासी आणि दुर्गम भागात. दुसरे म्हणजे, पारदर्शक ऑनलाइन ट्रॅकिंग आणि सार्वजनिक सेवा हक्क (RTS) कायद्याअंतर्गत स्पष्टपणे परिभाषित वेळेची मर्यादा असल्यामुळे विलंब कमी होतो आणि मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी होते. तिसरे म्हणजे, एकात्मिक ऑनलाइन अपील यंत्रणा नागरिकांना – विशेषतः असुरक्षित अर्जदारांना वेळेचे उल्लंघन झाल्यास भरपाई मिळविण्यास सक्षम करते, ज्यामुळे सेवा वितरणाची जबाबदारी मजबूत होते.

महाडीबीटी आणि शिक्षण प्लॅटफॉर्मशी या पोर्टलची सखोल एकात्मता देखील तितकीच महत्त्वाची आहे . प्रमाणपत्रे आता स्थिर कागदपत्रे राहिलेली नाहीत; ते जारी झाल्यानंतर जवळजवळ लगेचच पात्रता – शिष्यवृत्ती, पेन्शन आणि कल्याणकारी योजनांसाठी हस्तांतरण सक्रियपणे सुरू करतात. अशा प्रकारे, प्रशासकीय सुधारणा थेट आर्थिक आणि सामाजिक समावेशनात रुपांतरित होतात. वेळेवर जारी केलेले प्रमाणपत्र म्हणजे महाविद्यालयात राहणे, नियमित पेन्शन समर्थन मिळवणारे वृद्ध नागरिक किंवा दीर्घकालीन वंचितता कमी करण्यासाठी डिझाइन केलेल्या योजनांमध्ये कुटुंबाला प्रवेश मिळणे.

स्थापनेपासून कोट्यावधी सेवा विनंत्यांवर प्रक्रिया केल्यानंतर , आपले सरकार आता त्याच्या पुढील टप्प्यात प्रवेश करत आहे, ज्यामध्ये सखोल एकात्मता आणि अधिक समावेशकता आहे. नागरिकांसाठी प्लॅटफॉर्मचे वचन मूर्त आणि तात्काळ आहे: प्रमाणपत्रांना प्रवेशात आणि प्रवेशाला सक्षमीकरणात रुपांतरित करणे. महाराष्ट्रातील आदिवासी आणि उपेक्षित समुदायांसाठी – ज्यांना वेळेवर आणि पारदर्शक सेवांमधून सर्वाधिक फायदा मिळतो. हे परिवर्तन केवळ प्रशासकीय सुधारणांचे प्रतिनिधित्व करत नाही तर संधी आणि प्रतिष्ठेचा अर्थपूर्ण विस्तार दर्शवते.

# शाळांमध्ये आधार सेवा




## धाराशिव जिल्ह्यात आधार एमबीयू (MBU) शिबिरे

प्रत्येक बालकाचा आधार तपशील अचूक व अद्ययावत असणे हे समावेशक डिजिटल प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. या उद्दिष्टाच्या अनुषंगाने, महाराष्ट्रातील शाळांमध्ये आधार मोबाईल बायोमेट्रिक युनिट (MBU) अद्ययावत शिबिरांना महाआयटीकडून सक्रिय पाठबळ दिले जात आहे. अलीकडेच धाराशिव जिल्ह्यात अशी शिबिरे यशस्वीपणे आयोजित करण्यात आली असून, शालेय विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करत आधार सेवा थेट त्यांच्या शाळेत उपलब्ध करून देण्यात आल्या.

8 जानेवारी 2026 रोजी तामलवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत आधार एमबीयू अद्ययावत शिबिर यशस्वीपणे पार पडले. या शिबिरात विद्यार्थ्यांना शाळेच्या आवारातच आधार बायोमेट्रिक व लोकसंख्यात्मक (डेमोग्राफिक) तपशील अद्ययावत करण्याची सोय उपलब्ध झाली. या उपक्रमामुळे मुलांचे आधार अद्ययावत वेळेत पूर्ण होऊन शिक्षणविषयक व शासकीय सेवांचा सहज लाभ मिळण्यास मदत झाली.

6 जानेवारी 2026 रोजी काटी येथील येडेश्वरी कन्या प्रशाला येथे आधार एमबीयू अद्ययावत शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात विद्यार्थ्यांचे बोटांचे ठसे व डोळ्यांचे (आयरिस) स्कॅन यांसारखे बायोमेट्रिक तपशील अद्ययावत करण्यात आले, जे मुलांच्या वाढीसोबत आवश्यक ठरतात. शाळेच्या परिसरातच ही सेवा उपलब्ध झाल्याने पालक व शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.

यापूर्वी, 10 डिसेंबर 2025 रोजी जिल्ह्यात दोन आधार एमबीयू शिबिरे आयोजित करण्यात आली होती. पहिले शिबिर तालुका कळंब येथील सौंदणा आंबा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत, तर त्यानंतर तालुका तुळजापूर येथील कटगाव जिल्हा परिषद शाळेत पार पडले. या दोन्ही शिबिरांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि शाळा प्रशासनाच्या सहकार्यामुळे अद्ययावत प्रक्रियेचे काम सुरळीतपणे पार पडले.




हा उपक्रम पुढे नेत, 11 डिसेंबर 2025 रोजी अष्टा कासार येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आणखी एक आधार एमबीयू अद्ययावत शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिराचा उद्देश मुलांचे आधार नोंदी अद्ययावत करून भविष्यात शिष्यवृत्ती, परीक्षा, आरोग्य सेवा तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणी टाळणे हा होता.



# नागरिक प्रथम



## अहिल्यानगर जिल्ह्यातील मॉडेल “आपले सरकार सेवा केंद्रे”

डिजिटल प्रशासनाला खरा अर्थ तेव्हाच प्राप्त होतो, जेव्हा ते शेवटच्या टप्प्यापर्यंत—म्हणजेच गावागावांपर्यंत—पोहोचते. महाराष्ट्रात हे स्वप्न हळूहळू साकार होत असून, महाआयटीच्या माध्यमातून गाव पातळीवर सार्वजनिक डिजिटल सेवा वितरण अधिक मजबूत केले जात आहे. या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणजे अहिल्यानगर जिल्ह्यात 134 मॉडेल “आपले सरकार सेवा केंद्रांची” स्थापना, ज्यामुळे नागरिक आणि शासन यांच्यात एक सक्षम डिजिटल दुवा निर्माण झाला आहे.

ग्रामपंचायत स्तरावर कार्यरत असलेली ही मॉडेल सेवा केंद्रे शासनाच्या सेवा पारदर्शक, कार्यक्षम आणि वेळेत नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी रचण्यात आली आहेत. ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिक, महिला, शेतकरी तसेच रोजंदारीवर काम करणाऱ्या नागरिकांसाठी शासकीय सेवांचा लाभ घेणे म्हणजे दूरच्या कार्यालयांमध्ये वारंवार फेऱ्या, रोजगाराचे नुकसान आणि प्रक्रियात्मक अनिश्चितता अशी स्थिती होती. नव्या व्यवस्थेमुळे या अडचणी दूर होत असून, अत्यावश्यक सेवा थेट गावातच उपलब्ध होत आहेत.

या केंद्रांच्या संकल्पनेच्या केंद्रस्थानी 'नागरिक-केंद्रित प्रशासन' हे तत्त्व आहे. प्रमाणपत्रे, कल्याणकारी योजना, पेन्शन, महसूलविषयक सेवा तसेच विविध शासकीय मंजुरी यांसाठीच्या सेवा आता डिजिटल माध्यमातून स्थानिक पातळीवर उपलब्ध होत आहेत. यामुळे मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी होते आणि विलंब व मनमानी टाळून प्रणालीवरील विश्वास अधिक दृढ होतो.

विस्तृत दृष्टिकोनातून पाहता, ही केंद्रे केवळ सेवा देणारी ठिकाणे नसून ती डिजिटल सक्षमीकरणाची साधने आहेत. ग्रामीण नागरिकांना ऑनलाइन प्रणाली, डिजिटल दस्तऐवज आणि ई-गव्हर्नन्स प्रक्रियांशी परिचित करून देत, आपले सरकार सेवा केंद्रे शहरी आणि ग्रामीण महाराष्ट्रातील डिजिटल दरी कमी करण्यास मदत करत आहेत. यासोबतच डिजिटल प्रशासनाच्या परिसंस्थेत ग्रामपंचायतींची भूमिका अधिक सक्षम होत आहे.






# इंडिया एआय इम्पॅक्ट समिट




## भारतजेन, आयआयटी मुंबई, ओपनएआय आणि सर्वम एआय'सोबत महाराष्ट्राचे ऐतिहासिक सामंजस्य करार

***भारतजेन आणि आयआयटी मुंबई यांच्यासोबत सामंजस्य करार***

नवी दिल्लीत भारत मंडपम येथे आयोजित इंडिया एआय इम्पॅक्ट समिट 2026 मध्ये महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने भारतजेन टेक्नॉलॉजी फाउंडेशन (बीटीएफ) आणि भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई (आयआयटी बॉम्बे) यांच्यासोबत ऐतिहासिक सामंजस्य करार केला, आणि प्रभावी प्रशासनासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयुक्त वापराला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने आणखी एक प्रभावी पाऊल उचलले.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेला हा सामंजस्य करार म्हणजे महाराष्ट्राच्या सुरक्षित, बहुभाषिक आणि नागरिक-केंद्रित एआय-प्रणित प्रशासनाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल प्रशासन यांच्यातील सहकार्य वाढविण्याच्या दृष्टीने हा करार एक संरचित संस्थात्मक आराखडा प्रदान करणारा आहे. करार करणाऱ्या दोन्ही पक्षांमधील भागीदारी उदयोन्मुख कृत्रिम बुद्धिमत्ता, ज्ञानाची देवाणघेवाण, उपयोजित संशोधन, पथदर्शी प्रकल्प आणि क्षमता बांधणी या मुख्य घटकांवर प्राधान्याने लक्ष केंद्रित करेल.

या कराराच्या माध्यमातून भारतातील भाषिक विविधतेशी सुसंगत तसेच, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित बहुभाषिक आणि बहुआयामी प्रणाली विकसित करणे, पारदर्शकता, नैतिकता आणि स्पष्टीकरणक्षमतेची खातरजमा करणारा जबाबदार प्रशासन आराखडा स्थापित करणे, शासकीय विभागांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता-सहाय्यित निर्णय-सहाय्य साधने प्रदान करणे, नियंत्रित वातावरणात सँडबॉक्स-आधारित प्रात्यक्षिके आणि संकल्पनांचा पाठपुरावा करणे तसेच नियोजन, देखरेख आणि नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता-सहाय्यित प्रणाली लागू करणे या बाबींवर प्राधान्याने लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता-सहाय्यित डिजिटल प्रशासन आणि नागरिक सेवा वितरणात सहयोगी संधींचा शोध घेणे, हा या सामंजस्य कराराचा उद्देश आहे. यामध्ये कार्यशाळा, शासकीय अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम तसेच नवनवे एआय ट्रेंड आणि प्रशासन आराखड्याच्या धोरणांशी संबंधित सल्लामसलतींच्या देवाणघेवाणीचा समावेश आहे.

महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान सचिव श्री. विरेंद्र सिंह, आयआयटी मुंबईच्या ART (Academics, Research and Translation) उपक्रमाचे उपसंचालक प्रा. मिलिंद अत्रे आणि भारतजेन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ऋषि बाल यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

### ओपनएआय आणि सर्वम एआय सोबत सामंजस्य करार

कृत्रिम बुद्धिमत्ता परिसंस्थेचे सक्षमीकरण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ओपनएआय आणि सर्वम एआय सोबतसुद्धा स्वतंत्र सामंजस्य करार केले.

कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रगत मॉडेल्स, नागरिकांसाठी उपयुक्त एआय अनुप्रयोग आणि भारतातील सामाजिक-आर्थिक आणि भाषिक वैविध्याला अनुरूप अशा बहुभाषिक प्रणालींचा शोध घेणे, हा या भागीदारीचा उद्देश आहे.

भारतातील प्रत्येकासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता उपलब्ध असेल, अशा भविष्याच्या दिशेने सर्वम एआय वाटचाल करत आहे. जागतिक दर्जाच्या संशोधक आणि तंत्रज्ञांसह, सर्वम एआय कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणाली विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करते. भारतीयांची विचारसरणी, संवाद, तर्कसंगती आणि समस्या निवारणाच्या पद्धती लक्षात घेऊन त्यास अनुरूप पद्धतीने काम करणारे सर्वम एआय, या सहकार्याच्या माध्यमातून सार्वजनिक सेवा आणि प्रशासन मंचावर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या समावेशक वापराला मोठा हातभार लावेल.




*ओपनएआय सोबत सामंजस्य करार*

शिक्षण, तंत्रज्ञान संस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील जागतिक स्तरावरील दिग्गज आणि स्वदेशी स्टार्टअप्सच्या धोरणात्मक सहकार्यासह महाराष्ट्र राज्य, भारतातील कृत्रिम बुद्धिमत्ता-सहाय्यित डिजिटल प्रशासनाच्या आघाडीवर वेगाने आगेकूच करते आहे.

राजधानी नवी दिल्लीत भारत मंडपम येथे आयोजित इंडिया एआय इम्पॅक्ट समिट 2026 मध्ये महाराष्ट्र शासनाने स्वाक्षरी केलेले सामंजस्य करार हे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सरधोपट स्वीकारापलिकडे जात, प्रत्येक नागरिकाला लाभान्वित करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याप्रति राज्य शासनाची दृढ वचनबद्धता दर्शविणारे आहेत.

# क्षमता विकास

## डिजिटल प्रशासनाला मानवी स्पर्शाची जोड

डिजिटल प्रशासनाच्या क्षेत्रात देशातील अग्रगण्य राज्य अशी महाराष्ट्राची ओळख आहे. 'आपले सरकार' सारख्या मंचामुळे महाराष्ट्रात शासकीय सेवा अधिक सुलभ, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख झाल्या आहेत. या सेवा डिजिटल माध्यमातून राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचत असताना "तंत्रज्ञान आवश्यक आहे, मात्र अपेक्षित परिणाम साध्य करतात ती माणसेच" , हे वास्तव अगदी ठळकपणे अधोरेखित होते आहे. हे तथ्य लक्षात घेत, सेवा प्रदान करणाऱ्या मनुष्यबळाच्या क्षमता विकसित करण्याच्या उद्देशाने महाआयटीने क्षमता उभारणी कक्षाची स्थापना केली आहे.

### क्षमता उभारणीची आवश्यकता

महाराष्ट्रासारख्या सामाजिक-भौगोलिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण असणाऱ्या महाकाय राज्यात डिजिटल सेवा वितरणाची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र डिजिटल माध्यमातून शासकीय सेवा प्राप्त करण्यासाठी आजही बहुसंख्य नागरिक ग्रामस्तरीय उद्योजक, शासकीय कर्मचारी आणि सुविधा केंद्रांवर अवलंबून आहेत, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. शासकीय सेवा प्रदान करणाऱ्या परिसंस्थेत डिजिटल मंचाच्या उपलब्धतेबरोबरच सेवा प्रक्रियेतील स्पष्टता, डिजिटल यंत्रणा वापरण्याचा आत्मविश्वास, नागरिकांना मार्गदर्शन करण्याची क्षमता तसेच विविध संस्थांमधील समन्वय या बाबी महत्वाच्या ठरतात.

हे लक्षात घेत, सेवा प्रदात्यांच्या अंगी आवश्यक कौशल्ये विकसित करण्याच्या उद्देशाने दीर्घकालीन उपाययोजना म्हणून क्षमता उभारणी कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

### उपाययोजना निश्चितीपूर्वी वास्तव परिस्थितीचे आकलन

सेवा प्रदात्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाची रचना करण्यापूर्वी, क्षमता उभारणी कक्षाने प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेण्यास प्राधान्य दिले आहे.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून नाशिक जिल्ह्यातील सुमारे 50 ग्रामस्तरीय उद्योजकांबरोबर प्रत्यक्ष संवाद साधण्यात आला. नाशिक जिल्ह्यात शहरी आणि निमशहरी भाग आहे, आदिवासी पाडे आहेत, त्याचबरोबर ग्रामीण आणि दुष्काळप्रवण प्रदेश सुद्धा आहे. जिल्ह्यातील या भागांतील ग्रामस्तरीय उद्योजकांबरोबर साधलेल्या संवादांमधून सेवा वितरणाचे दैनंदिन कामकाज, ते करताना येणारी आव्हाने आणि या उद्योजकांच्या अपेक्षांबद्दल विश्वासार्ह तपशील प्राप्त झाले.

उपक्रमाच्या पुढच्या टप्प्यात, जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवरील शासकीय कर्मचाऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला जाईल, आणि आणखी काही तथ्ये संकलित केली जातील.

या क्षेत्रीय अभ्यासाच्या आधारे संपूर्ण राज्यातून मोठ्या प्रमाणावर माहिती संकलित करण्यासाठी महाआयटीचा क्षमता उभारणी कक्ष ऑनलाइन सर्वेक्षण साधने विकसित करत आहे. या सर्वेक्षणात ग्रामस्तरीय उद्योजक, शासकीय कर्मचारी, सेवा वापरणारे नागरिक, यंत्रणेची रचना, अंमलबजावणी आणि समन्वय साधणारे महाआयटीचे मनुष्यबळ अशा सर्व घटकांचा समावेश केला जाणार आहे.

### कुशल क्षमता उभारणीच्या दिशेने...

ग्रामस्तरीय उद्योजकांसोबत साधलेल्या प्रत्यक्ष संवादातून प्राप्त माहितीच्या आधारे, महाआयटी, या कामी कार्यरत मनुष्यबळासाठी क्षमता उभारणी कार्यक्रम तयार करत आहे. या प्रक्रियेचा एक भाग म्हणून महाआयटी नामवंत संस्थांशी संवाद साधत आहे.

या संदर्भात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी महाआयटी कार्यालयाला भेट दिली असून या भेटीत अनेक महत्वपूर्ण मुद्द्यांबाबत चर्चा करण्यात आली. या विद्यापीठाचा समृद्ध अनुभव आणि राज्यभरातील विद्यापीठाची 2300 पेक्षा जास्त अभ्यास केंद्रे, महाआयटीच्या या उपक्रमासाठी मोठा हातभार लावणार आहेत.

### पुढची वाटचाल

क्षमता उभारणीच्या या टप्प्यात सध्या नियोजनाचे काम सुरू आहे. शासकीय सेवा डिजिटल मंचामार्फत प्रदान करणाऱ्या मनुष्यबळाची योग्य प्रकारे क्षमता उभारणी करणे आणि या माध्यमातून त्यांना सक्षम आणि आत्मविश्वासाने परिपूर्ण करणे हे या उपक्रमाचे ध्येय आहे. हे ध्येय साध्य करण्याच्या प्रवासात, राज्यभरातील नागरिकांना सेवा प्रदान करणाऱ्या मनुष्यबळाचे संवेदीकरण साध्य होईल, आणि ग्रामस्तरीय उद्योजक हे शासन आणि नागरिकांमधला दुवा म्हणून यशस्वी ठरतील, अशी अपेक्षा आहे.



# महाराष्ट्राच्या दुर्गम भागात आधार शिबिरांचे आयोजन

महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातील दुर्गम आणि निम-शहरी भागांमध्ये आधार नोंदणी तसेच आधार तपशील अद्ययावत करण्याची शिबिरे यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली. या शिबिरांमुळे नागरिकांना, विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, रोजंदारी मजूर आणि विद्यार्थ्यांना आधार-संबंधित सेवांसाठी दूरवर प्रवास करावा लागला नाही, तसेच श्रमजीवींना मजुरीतून होणारी आपली रोजची कमाई गमवावी लागली नाही, हे विशेष.

हाडोळती, हलगर, किणगाव, चापोली, चिंचोली बल्लाळनाथ येथील ग्रामपंचायत कार्यालयात, चाकूर पंचायत समितीमध्ये, देवणी नगर पंचायतीमध्ये आणि उदगीर नगर परिषदेमध्ये या शिबिरांचे आयोजन करण्यात आले, त्यामुळे त्या परिसरातील ग्रामस्थांना अगदी सहजपणे या सेवांचा लाभ घेता आला.

आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये ग्रामस्तरीय उद्योजक म्हणून कार्यरत असणारे तानाजी गोविंद हत्तरगे, संतोष विश्वनाथ बारुडे, किशोर संगप्पा बेलुरे, सुरेश शिवराज साखरे, गुलवे मनमथ प्रेमरस, अझहर मियाँ युसुफ मियाँ देशमुख आणि प्रशांत नंदकिशोर शेटे यांच्या समर्पित प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वी झाला. या सर्वांनी अतिशय व्यावसायिक पद्धतीने अर्जदारांची नोंदणी केली, बायोमेट्रिक तपशिलांचे संकलन केले, आणि कागदपत्रांची पडताळणी केली.

## बैठक

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आनंद भंडारी यांच्या उपस्थितीत, जिल्ह्याच्या सर्व विभाग प्रमुखांसोबत, आपले सरकार आरटीएस सेवा आणि अपीलांचा आढावा घेण्यात आला.

बीड जिल्हाधिकारी कार्यालयात, छत्रपती संभाजीनगर येथील माननीय आरटीएस आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली दुसरी आरटीएस आढावा बैठक आयोजित करण्यात आली.








# महाराष्ट्राच्या डिजिटल आणि एआय रोडमॅपला बळकटी

महाराष्ट्र राज्याला तंत्रज्ञानाधिष्ठित व नवोन्मेष-नेतृत्वाखालील अर्थव्यवस्थेच्या दिशेने नेण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. आशिष शेलार यांनी महाआयटीची सविस्तर आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी राज्यात सुरू असलेल्या डिजिटल उपक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेतला, तसेच भविष्यातील धोरणात्मक दिशा निश्चित करण्यावर भर देण्यात आला.

या बैठकीस माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव श्री. विरेंद्र सिंह आणि महाआयटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भगवान पाटील उपस्थित होते. चर्चेदरम्यान डिजिटल गव्हर्नन्स अधिक सक्षम करणे, नागरिक-केंद्रित आयटी सेवा वेगाने राबवणे, सायबर सुरक्षेची चौकट मजबूत करणे तसेच शासकीय विभागांमध्ये कार्यक्षमता वाढवण्यासाठी उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर विशेष भर देण्यात आला. मा. मंत्र्यांनी परिणामाभिमुख अंमलबजावणी, विभागांमधील समन्वय आणि भविष्यासाठी सज्ज डिजिटल पायाभूत सुविधांचे महत्त्व अधोरेखित केले, ज्यामुळे महाराष्ट्राच्या वाढत्या डिजिटल आकांक्षांना बळ मिळेल.

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षमतांच्या प्रगत दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून, महाआयटी ने आयआयटी बॉम्बे–भारतजेन (BharatGen) टीमसोबत धोरणात्मक चर्चा केली. या बैठकीत भारतजेनचे प्रमुख संशोधक (Principal Investigator) व संचालक मंडळाचे सदस्य प्रा. गणेश रामकृष्णन तसेच महाआयटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भगवान पाटील सहभागी झाले. आयआयटी बॉम्बे, भारतजेन आणि महाराष्ट्र राज्याच्या आयटी परिसंस्थेमधील सहकार्याच्या शक्यता या बैठकीत तपासण्यात आल्या.

भारतजेन ही शासन समर्थित, राष्ट्रीय स्तरावरील एक महत्त्वाकांक्षी उपक्रम असून, भारतातील भाषिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विविधतेचे खरे प्रतिबिंब उमटवणारी सर्वसमावेशक, बहुभाषिक जनरेटिव्ह एआय मॉडेल्स विकसित करण्यावर त्याचा भर आहे. या सहकार्याद्वारे प्रशासन, सार्वजनिक सेवा वितरण आणि डिजिटल समावेशनासाठी एआय-आधारित उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांचे प्रायोगिक अंमलबजावणी व विस्तार करण्यामध्ये महाराष्ट्र अग्रणी भूमिका बजावण्यासाठी सज्ज आहे. या सर्व उपक्रमांमुळे डिजिटल परिवर्तनाला चालना देणे, शैक्षणिक संस्था व उद्योग क्षेत्रातील भागीदारी मजबूत करणे तसेच भारताच्या एआय- सक्षम भविष्यात महाराष्ट्राला अग्रस्थानी नेण्याची महाआयटीची कटिबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित होते.



**योगदान:**
धीरेंद्र सिंग

**तपशील समन्वय, संकलन आणि यशोगाथा:**
प्रज्योत आयरे आणि जिल्हास्तरीय सहकारी
शुभांगी शिंदे-शेख
संतोष केकरजवळेकर

**रचना, सजावट:**
हर्षवर्धन बगाडे, सूर्यकांत उभे

**संपादकीय योगदान:**
माधुरी पांगे
सुभाष शेळके
नरेश इंगळे
मुकेश शर्मा
अभिषेक पाटील

**आम्हाला फॉलो करा**

@MahaIT
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
आपले सरकार

**प्रकाशक**

MahaIT
IMAGINE. INVENT. INSPIRE

अपीजे हाऊस, तिसरा मजला,
दिनशॉ वाच्छा रोड, के. सी. कॉलेज जवळ,
चर्चगेट, मुंबई, महाराष्ट्र 400020

**ई-मेल:** editor@mahait.org
**संकेतस्थळ:** https://mahait.org